म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

ालय क्रमांक

लेखक जनार्दन महादेव गुर्जर

सन

पुस्तकाचें नांव प्रौढप्रतापनिधी माधवराव

२९९

२४

चरित्र

ई ३०७

धनुर्धारीरचित

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# प्रौढप्रतापनिधि माधवराव.

हें पुस्तक

जनार्दन महादेव गुर्जर

बुकसेलर आणि पब्लिशर ह्यांनीं

मुंबईंत,

जावजी दादाजी

ह्यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

सन १८९७

२.२३०

# प्रौढप्रतापनिधि माधवराव.

११ वर्षें कारकीर्द. १७६१–७२.

**ओळख:**—श्रीवर्धनचे कुळकर्णी **बाळाजी विश्वनाथ भट.** हे कोंकणांतून पुण्यास आले आणि त्यांनीं, **श्रीछत्रपति महाराज शाहू** यांच्या कारकिर्दींत पिंगळ्यांकडील पेशवाई आपणाकडे करून घेतली. पेशवाईपदाला अवश्य असे अनेक गुण यांच्या अंगीं होते, आणि स्वत:च्या कमाईवर धन्याची पूर्ण मर्जी संपादन करून ते आपल्या शिरावरील जबाबदारींतून उत्तम प्रकारें मोकळे झाले. ह्मणजे पेशवाईपद मिळाल्या दिवसापासून येथला त्यांचा कारभार आटोपे तोंपर्यंत त्यांनीं आपल्या कामांत, धन्याच्या सेवेंत, आणि राज्यविस्तार वाढवून हिंदुपदपातशाहीचा जम बसविण्यांत लेशमात्र कसूर केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर, यांनीं हीं कामें बजाविली तशीं इतर कोणांसही बजावितां आलीं नसतीं. असा कर्तृत्ववान् पुरुष **बाळाजी विश्वनाथ** होता. त्यानें जन्मास येऊन आपलें सार्थक उत्तम केलें, आपल्या कुळीचा लौकिक गाजविला आणि आपल्या दरोबस्त देशबंधूंस, 'आपल्यावर याचे खरोखर अविस्मार्य उपकार आहेत' अशी खात्री करून दिली. हा पेशवा कांहीं वर्षें अधिक जगता तर महाराष्ट्रियांच्या सुखसागराची भरती बरीच वेळ कायम राहिली असती. पण तेवढें महाराष्ट्रियांचे नशीब बलवत्तर नाहीं, यामुळें हा पेशवा अवघीं सहाच वर्षें पेशवाई गाजवून इ० स० १७२० सालीं कैलासवासी झाला. त्याला मुलगे दोन. वडील **बाजीराव** आणि धाकटा **चिमाजी अप्पा.** बापसे बेटा सवाई, असें जगाकडून **बाजीरावानें** ह्मणवून घेतलें. **बा-**

ळाजींची पेशवाई **बाजीरावास** मिळाली आणि त्यानें आपल्या समशेरीच्या जोरावर, राज्यकार्यधुरंधरतेच्या योगानें आणि एकनिष्ठ स्वामिसेवेनें मराठ्यांचा दरारा चोहोंकडे सारखा बसवून हिंदुपदपातशाहीची इभ्रत मनस्वी वाढविली. ब्राह्मणांच्या अंगीं विलक्षण क्षात्रतेज चमकूं शकतें आणि त्या तेजांपुढें मी मी ह्मणणारे अगदीं फिक्के पडतात, याचा अनुभव या **बाजीरावानें** दिनदुनयेस आणून दिला. मोंगलबादशहांस–ह्मणजे ज्यांनीं शेंकडों वर्षें हिंदुस्थानास पादाक्रांत करून आह्मी काय ते शूर, वीरबच्चे, युद्धकलाविशारद, समरभट, असा दिमाख मिरवावा, आणि हिंदुस्थानचे लोक ह्मणजे यःकश्चित, समरभीरू, शुद्ध मेंढरें, असें आपल्या कृतीनें दाखवावें अशांस–चळचळ कांपावयास लावणारा हाच मराठा योद्धा **बाजीराव** पेशवा ! कीं ज्याचें फक्त नांव ऐकतांच मोठमोठे कडवे–खंदे लढवय्ये इमाम दांडगे मुसलमान गर्भगळित होत, आणि ज्याच्या गर्जनेसरशी एवढी मोठी दिल्लीपातशाही पण ती भीतीनें भेदरून जाई; अशी शिंदे, होळकर, गाइकवाड, पवार अशांसारख्या नरशार्दूलांना, उदयाला आणणारा पंतप्रधान पेशवा तो हाच **बाजीराव.** या **बाजीरावानें** सुमारें वीस वर्षें पेशवाई हांकली न हांकली तोंच दुष्ट काळानें त्याच्यावर झडप घातली. इ० स० १७४० सालीं **नानासाहेब**–बाजीरावाचा वडील पुत्र–पेशवा झाला. याचा भाऊ **राघोबा, चिमाजी अप्पाचा** मुलगा **सदाशिवराव** भाऊ. **राघोबा** आणि **भाऊसाहेब** यांनीं, मराठी साम्राज्याचा पाया श्रीछत्रपतीनें घातला, त्याजवर कळस लावण्याचे प्रयत्न केले. तों श्रीछत्रपति **शाहूमहाराजही** इतक्यांत कैलासवासी झाले. आणि हिंदुपदपातशाहीचीं **सूत्रें** पंतप्रधानपेशवे यांच्या हातीं आलीं. किंवा पर्यायेंकरून पेशवे

मराठी राज्याचे मालक झाले; तथापि कागदोंपत्रीं उल्लेख धन्याच्या नांवानें करीत. आपण सातारकरांचे अंकित असें सांगत, ह्मणत; पण सत्ता सारी त्यांच्याच हातीं आली होती व श्रीशाहूमहाराजांनीं सनदही करून दिली. नानासाहेबांच्या पेशवाईत मराठी राज्याची भरभराट बरीच झाली पण त्यांना अखेर कांहीं चांगलीशी साधली नाहीं! दिल्लीकर बादशहा मराठ्यांच्या हातचीं बाहुलीं झालीं, त्यांचा कच्चा खर्च मराठे चालवीत. अन्नवस्त्र मराठ्यांनीं द्यावें तेव्हां दिल्लीपतीस पांघरावयास मिळे. अशी स्थिति अकबर, बाबर, जहांगीर, औरंगजेब या बादशाहांच्या वंशजांस मराठ्यांच्या दर्पामुळें आली. पण इतक्यांत ईश्वरी क्षोभ, कोणत्या कारणानें तो कळत नाहीं, मराठ्यांवर झाला. आणि त्यामुळें पानिपतचें भयंकर रणकंदन माजलें. या कंदनांत मराठ्यांची दोन अडीच लाखांची आहुति पडली, आणि इतका वेळ त्यांची हिंदुस्थानभर बसलेली घडी एकदम बिघडून गेली! हिंदुस्थानांत ह्मणजे नर्मदेच्या पलीकडे मराठ्यांचा मोठा विलक्षण दरारा बसला होता. मराठे या कालीं सार्वभौम सत्ता उपभोगीत होते; रजपूत, जाट इत्यादि तमाम राजेरजवाडे पेशव्यांस दरसाल करभार देत. आणि शेवटीं शेवटीं तर भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तख्त फोडून त्या सिंहासनावर युवराज विश्वासराव यांस बसविलें, आणि ब्राह्मणपाच्छाईची द्वाही सुद्धां फिरविली! ह्मणजे सारांश, मराठ्यांच्या सत्तेची यावेळीं अगदीं सीमा होऊन चुकली. अमुक कर्तव्य असें कांहीं एक ह्मणण्याजोगें राहिलें नव्हतें; पण इतक्यांत दुर्दैवानें उचल घेतली. दुस्मानांस खाऊं कां गिळूं, अशा त्वेषानें दांत ओंठ चावीत महाराष्ट्रभूंतील दोन अडीच लाख मनुष्यें, शिपाई, मोंगलाचा पुरा निःपात करून निर्यवन आर्यभू कर-

ण्याच्या ईर्षेनें निघाले. आपणांस ह्मणजे युद्धांत पराजय येईल, आफगाणिस्थानच्या गिलच्यांस हार आपण जाऊं, असें त्यांच्या ध्यानीं मनीं देखील नव्हतें ! आपलीं वायकापोरें इत्यादि बुणगे बरोवर घेऊन वऱ्हाडकरी लग्नास जातात त्या थाटानें मराठे मर्द गिलच्यांचा सूड घेण्यास गेले. पण अनेक अपरिहार्य संकटामुळें, मुख्य सेनानीच्या अप्रबुद्ध अशा बेवकूफीच्या योगानें आणि नंतर ईश्वरी नियमानुसार पानपतकर्नोल मुक्कामीं गिलचे आणि मराठे यांत जें भयंकर रणकंदन माजलें त्यांत मराठ्यांचा पुरा निःपात झाला. अडीच लाख सैन्य, कृतीनें काळावर चालून जात आहे कीं काय अशा हिमतीचें, भारतयोद्धासारख्या शूर समरभटांच्या दिमतींत असतां ह्या वनघोर संग्रामांत गडप्प झालें ! मराठ्यांवर ईश्वर अतिशयच कोपला. सारी महाराष्ट्रभू हाय हाय करीत धाय मोकलूं लागली. जिकडे तिकडे महाराष्ट्रभर शोक, दुःख यांचाच भडका उठला. एक ह्मणतो, माझा भाऊ गेला, दुसरा आपल्या पुत्राचा शोक करितो, तर तिसरीचें सौभाग्य हरवलें ह्मणून ती आक्रोश करिते; असा एकच आकांत उडून गेला. गुऱ्हाळांत उंसाचे शेंडे मळेकरी मनांत कांहीं दिक्कत न धरितां तोडीत असतो त्याप्रमाणें, दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडून भांबावलेल्या व आपणांस एकाएकीं अगदीं प्रतिकूळ असा काळ आल्यामुळें कांहींएक सुचेना ह्मणून वेडावलेल्या मराठ्यांची गिलच्यांनीं कत्तल केली ! असो. एकंदरींत आपल्या कट्टया दुस्मनांवरही प्रसंग येऊं नये असा वखत महाराष्ट्रांतील आमच्या पूर्वज जातभाईवर आणि वाडवडिलांवर आला. पेशवे **नानासाहेब**, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव **विश्वासराव** हे त्या रणकुंडांत पडले ! पेशव्यांचे चुलत बंधु आणि ज्यांच्यावर साऱ्या राज्याची भिस्त **नानासाहेबांनीं** टाकिली ते कोठें

गेले याचा पत्ता नाहींसा झाला. शापादपि शरादपीसारखे पेशव्यांचे सरदार या गर्दींत कोणीकडल्या कोणीकडेच उधळून गेले, असा जो कांहीं आकांत झाला तो सांगून पुरवत नाहीं ! या भयंकर रणकंदनामुळें व पुत्रशोक आणि त्यांत बंधुवियोगाची भर पडून अपमानाची मनास सारखी टोंचणी लागली, त्यामुळें **नानासाहेबां**सारख्या राजविलासी पेशव्याची कंबर खचून जाई यांत नवल तें कोणतें ? आणि त्या हायीनेंच पेशवे **नानासाहेब** यांस स्वर्गवास लवकर मिळाला. **राघोबाभरारी**सारखा बंधू **नानासाहेबां**शेजारीं होता; पण त्यांच्या जिवाला कांहीं समाधान वाटेना. अशाप्रकारें इ० स० १७६१ सालीं **नानासाहेब**पेशव्यांचा कारभार आटोपला. त्या पेशव्याला एकंदर पुत्र तीन. वडील **विश्वासराव;** त्यांची पानपतच्या रणकंदनांत आहुति पडली. दुसरे **माधवराव,** आजच्या चरित्राचे नायक आणि सर्वांत धाकटे **नारायणराव.** नानासाहेब वारले तेव्हां **माधवरावाचें** वय अवघें सत्रा वर्षांचें होतें. त्यांची मातोश्री व पित्रव्य **राघोबा** हेच कायते त्यांना वडील थोर. **माधवरावांस** वडिलांच्या पश्चात् लगेच पेशवाईचीं वस्त्रें सातारकर **श्रीछत्रपति रामराजे** यांजकडून मिळालीं. (इ० स० १७६१). इतकी ही ओळख **माधवरावां**संबंधानें पुरे झाली.

२ **गृहकलहः**—आमच्या देशांत गोकुळासारखे नांदणारे छपन्न राजे होते. ज्या त्या मुलखांत स्वराज्य होतें, म्हणजे जो तो घरचा मालक असे. कोणी कोणाचा दास, बंदा किंवा गुलाम नव्हता. या देशांत लक्ष्मीचा वास होता आणि कुबेराचा खजिनाही याच देशांत असे. जमीन कामधेनूप्रमाणें लागेल तो पदार्थ आपल्या लेंकरास मुबलक देई. रानांवनांत कल्पतरू

असत आणि जो तो चिंतामणीसारखा भाग्यवान होता. पण पुढें काय झालें तर "मुरगी मरगई बचडे दाणादाण." अशी आमची अवस्था, आमच्यांतील सलोखा व प्रेमभाव गेल्यामुळें झाली. आर्यावर्त सुवर्णभूमी; आर्यावर्त नंदनवन; हिंदुस्थान-देश लक्ष्मीचें माहेर अशी दिगंत कीर्ति पसरली होती. ती कंगाल राष्ट्रांच्या कानांवर गेली आणि ज्याला त्याला वाटे काय कीं, आ-पण या आर्यभूंत जाऊन लूट मिळवावी, या त्यांच्या इच्छेला आमच्या लोकांच्या गृहकलहानें चांगली कुमक केली. आजला-सुद्धां आह्मीं आमचीं राज्यें गमावून घेतलीं आहेत आणि सर्व दुनयेंत अगदीं नादान, पोंचट व दैन्यास्पद अशा दैनेंत लोळत आहों; याचें खरें कारण आमच्यांतील गृहकलह हेंच होय. पृथ्वीवर छप्पन्न देश आहेत. जेथें तेथें तेथलाच राजा असतो. इंग्लंडांत इंग्रज राजा, जर्मनींत जर्मन राजा, आस्त्रियांत अस्ट्रे-लियन राजा, पोर्टुगालांत पोर्टुगीस, अरबस्थानांत अर्बी, चिनांत चिनी. पण हिंदुस्थानांत हिंदु राजा नाहीं! अस्तु.

आमच्या देशाच्या इतिहासांतून आह्मांला शिकावयाचें पहिलें आणि अतिमहत्वाचें तत्व ह्मणजे हेंच कीं, परस्परांतील द्वेष, आपसांतील गृहकलह आणि तो मिटविण्यासाठीं परक्यांच्या नारदी मध्यस्ती; यांच्या योगानें आह्मी असे रसातळास गेलों आहोंत. आज आमच्या अशा कोणत्याच वस्तूवर आमची सत्ता नाहीं, आह्मी आणि आमचें या शब्दांचा, मोठ्या ताठ्यानें उपपद मागें लावूं असा प्रकार कोठेंच आणि कांहींच नाहीं. अशी जी स्थिति झाली आहे त्याचें मुख्य कारणही आमच्यांतील गृहक-लह होत. एवढी मोठी हिंदुपदपातशाही, ती उभारण्यास के-वढालीं साहसें आणि खटपटी कराव्या लागल्या; पण ती इमारत हां हां ह्मणतां कशी जमीनदोस्त या गृहकलहानें केली. हें, तो

इतिहास वाचूं लागलें ह्मणजे तेव्हांच ध्यानांत येतें. पेशव्यांच्या-पुण्यप्रतापी सदायशवंत पंतप्रधानांच्या घरांत या कलहाग्नीनें आपलें बिऱ्हाड ठेविलें, त्यांत सर्व स्वाहाकार झाल्यावरच बिचारा तो अग्नि थोडासा थंड झाला.

**माधवरावांची** मातुश्री **गोपिकाबाई** आणि चुलती **आनंदीबाई**—कृत्या, कैदासीण-या बायकांत चुरस सुरू झाली. **गोपिकाबाईला** वाटे काय कीं, आपण पेशव्यांची प्रत्यक्ष मातुश्री, **नानासाहेबाची** स्त्री. माझा मान मोठा असावा आणि मला वांकून सर्वांनीं रहावें. **आनंदीबाई** ह्मणे, **राघोबा** ह्मणजे सर्वांत अप्रतिम शूर, त्यानें लाहोर, पंजाबपर्यंत दौड मारून आपल्या घोड्यांस अटकेपर्यंत नेऊन सिंधूंत त्यांना न्हाऊं घातलें. त्याचा वचक फार आणि त्याच्याच जोरावर पेशवाई चाललेली, **माधवरावांस** वस्त्रें देवविलीं त्यांनीं, त्यांच्या धोरणानें सर्व कांहीं चाललें पाहिजे. **राघोबाचा** दरारा आहे ह्मणून पेशव्यास कोणी राहूं तरी देत आहे. पानिपतांत सर्व सैन्याची गाळण झाली तेव्हां पेशव्यांना कोण विचारतो? ही ऐट **आनंदीबाईची**. तिनें आपल्या नवऱ्यापाशीं सदा कटकटी करीत असावें कीं, तुह्मी असे कोरडे कां? पेशवाईचे अर्धे भागीदार असून अशा मिंधेपणानें कां राहतां? पोरांनीं

---

१ होळकराच्या कैफियतींत **राघोबाचें** व **माधवरावाचें** वांकडें येण्याचें एक कारण असें दिलें आहे कीं, नर्मदेकडे कांहीं कामानिमित्त **राघोबा** ससैन्य गेला, आणि येतांना कर्ज घेऊन आला. तेव्हां **माधवरावानें** ह्मटलें, काका, भाऊनाना होते तोंवर तुह्मीं दौलतीस कर्ज आणिलें तर त्याची व्यवस्था करण्याला ते समर्थ होते. "आतां आह्मांस दौलतीस वडील आपण. सावकारांचें देणें व लोकांचें देणें याचा धरबंद आपल्यास कर्तव्य तसा करावा. शिलक साखळी असल्यास आमचे स्वाधीन केली तर संभाळून ठेऊं." ह्मणजे पा-

तुमच्यावर हुकुमत बजावावी आणि तुह्मीं त्यांच्या धोरणानें वागावें यांत पुरुषार्थ कोणता ? दुर्दैवानें **राघोबा** स्त्रैण असे. खमक्या शूर लढवय्या, त्याला सारे चळचळ कांपत. दौड मारूं लागला ह्मणजे तीस तीस चाळीस कोस घोड्यावरील खोगीर हालवावयाचा नाहीं, त्याचें नांव ऐकूनच त्याचे शत्रू गर्भगळीत होत हें अगदीं खरें. तो मोठा दिलदार, आपपरभाव त्याच्या मनांत यावयाचा नाहीं. मोठा कनवाळू आणि सरळ दिलाचा असे, यांत बिलकुल संशय नाहीं; पण या त्याच्या सर्व गुणांवर विरजण पडे, तें त्याच्या स्त्रैणपणामुळें. ह्मणजे त्याच्या बायकोचा—कृत्या **आनंदीबाईचा**, त्याच्यावर सदा आणि पूर्णपणें पगडा असे. **राघोबा** सांप्रत त्याच्या सर्व हयात व भावी अशा प्रजेच्या शापास, तिरस्कारास आणि द्वेषास पात्र झाला याचें कारण त्याची स्त्री **आनंदीबाई** होय. आपल्या राज्यांत इंग्रजांना आणलें तें या **राघोबानेंच**. आपल्या बायकोच्या गोष्टी ऐकून गोत्रजहत्या, पुत्रहत्या—पुतण्या—ब्रह्महत्या केली, ती या **आनंदीच्या** नादीं लागूनच. हिंदुपदपातशाही पोकळ करून ठेविली व ती लोकांच्या पदरीं बहुतेक घातली ती या **राघोबानेंच**. तात्पर्य बायकोच्या कानमंत्रावरूनच **राघोबा** हा अशाप्रकारचा मनुष्य झाला.

**नानासाहेब** कैलासवासी झाले, पानिपतांत मराठ्यांचा निःपात झाला, त्यांच्यांत आतां कोणी आवरणारा व कर्ता उरला नाहीं, हें पाहून हिंदुस्थानांत उत्तरेकडे पेशव्यांचे मांडलिक आपले हातपाय पसरीत पेशव्यांच्या सार्वभौम सत्तेस धुडकावूं लागले. एक नाकें धरून बसलेले शिंदे, बहुतेक नाहींसेच झाले.

---

निपतांत भाऊसाहेब गेले याचें कारणही **राघोबाचें** कर्ज. आणि गृहकलहाचें कारणही तेंच दिसतें.

दोघे उरले ते अल्पवयी असत. तेव्हां विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारोशंकर यांची रवानगी हिंदुस्थानांत राघोबानें करून दिली; आणि आपली सत्ता ते यथापूर्वक स्थापूं लागले. तेव्हां हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यांसही वाटलें कीं, अरे! अजून पेशव्यांचा दर्प उग्र आहे; आपल्याला ते हार जावयाचे नाहींत; आपण त्यांच्यांशीं दंडेलगिरी करून उपयोगाची नाहीं; ते आपली चांगलीच खोडकी मोडतील! आणि तेंही खरेंच. विठ्ठल शिवदेव ह्मणजे भारीच शूर पुरुष. तो एकटा सर्वांस पुरून उरण्याजोगा. नर्मदेपार पाऊल पडतांच या विठ्ठल शिवदेवानें पेशव्यांचा दरारा पूर्वींपेक्षां कांकणभर जास्तच बसविण्याचा क्रम ठेविला.

इकडे हद्राबादेकर निजाम यांना आज चाळीस वर्षांत कधीं आला नाहीं तो योगायोग आला असें वाटे. पेशवाई अजीबात रसातळास दडपावयाची असेल तर वखत हाच, ही त्याची समजूत, व ती अक्षरशः खरी. ह्मणून तोही असल्या नसल्या कुरापती काढूं लागला. इतक्यांत राघोबा आणि माधवराव यांच्यांत चांगला बेबनाव आला. राघोबा व तत्पक्षी कारभारी यांस वाटे काय कीं, माधवरावाचें आमच्याविणें कांहींएक चालावयाचें नाहीं. त्याला आमचीं आर्जवेंच केलीं पाहिजेत; आणि ह्मणून ते फार शेफरले होते. माधवराव पेशवा पहिल्या प्रतीचा तापट, मोठा मानी, आणि भारी हिम्मतदार. कारभारीमंडळ असें शेफरलेलें त्याला कोठून खपावयाला? त्यानें तात्काळ अशा मानगर्वाधिरूढ मंडळीच्या डोळ्यांत अंजन घालण्याचा निश्चयच केला. त्रिंबकराव माम

---

१ जवानमर्द ब्राह्मणभाई २ मध्यें ह्या शूर पुरुषाचे पराक्रमाचें वर्णन आहे.

पेठे यांस बोलावून आणून त्यांच्याकडे **माधवरावानें** मुख्य दिवाणगिरीचें काम सोंपविलें. मिरजकर पटवर्धन, त्यांच्या हाताखाली काम करीत. **बाबूराव** यांजकडे फडणीसी सोंपविली. अशाप्रकारें **माधवराव** स्वतःच कारभार पाहूं लागला. हें कांहीं **राघोबास** खपेना. त्याला व त्याच्या साथीदारांना वाटत होतें कीं, आपणाखेरीज कांहींएक चालत नाहीं असें पाहून **माधवराव** आपलें आर्जव करूं लागेल. पण तसें घडेना. हें पाहतांच त्यांचें मन फार खट्टू झालें. तेव्हां **माधवरावाला** युद्धांत पराभूत करून त्याची पेशवाई आपण बळकवावी असा **राघोबानें** निर्धार केला! **राघोबा** चुलता. **माधवराव** पुतण्या. आणि त्याच्याशीं लढाई—आणि ती कां, तर, राज्यलोभासाठीं प्रत्यक्ष चुलता, ब्राह्मणवीर—करावयास धजावतो! कमाल आहे लोभाची! इतकेंच याठिकाणीं ह्मटलें पाहिजे. याव्यतिरिक्त काय ह्मणावयाचें? आणि असा हा पुतण्याचा सूड घेण्यासाठीं चुलत्यानें केलें काय? तर कदीम दुस्मन्, हिंदूंचा हाडवैरी हैद्राबादकर नबाब कीं, जो केव्हां पेशव्यांचा निःपात होईल ह्मणून सदां टपलेला, ज्याच्याशीं साऱ्या पेशव्यांनीं अनेक लढाया करून ज्या नबाबास आपल्या ताटाखालचें मांजर करून ठेविलेलें, त्या हैद्राबादकरांच्या खाकेंत शिरून **राघोबा,**—पेशवे **माधवराव** अल्पवयी असा—आपलाच प्रत्यक्ष पुतण्या समरांत पराभूत करण्यास सिद्ध झाला. हा असा गृहकलहाग्नि पेटल्यावर **माधवरावांस** अडचणी किती आल्या असतील, त्याला कोण दगदग झाली असेल हें कांहीं कोणास सांगितलें का पाहिजे?

३ **पहिली ठिणगी:**—राज्यकारभारांतून **राघोबा** व त्याच्या पक्षांतील सर्व मंडळी यांनीं आपलीं अंगें काढून घेतलीं. **विठ्ठल शिवदेव** हिंदुस्थान सर करीत व आपला दबदबा पूर्ववत बस-

वीत चालले होते. पानिपतानंतर पेशव्यांची सत्ता कोणी जुमानीत ना असें सर्वत्र झालें होतें. विठ्ठल शिवदेव यांच्या समशेरबहादुरीनें पूर्वापेक्षां कांकणभर जास्तच सर्व हिंदुस्थान पेशव्यांस कांपूं लागलें. असलें महत्वाचें काम विठ्ठल शिवदेव यांजकडे होतें व त्यांना होईल ती जास्त कुमक देणें अशाप्रसंगीं अत्यावश्यक होय ! पण स्वहितबुद्धि अतिशय कोती आणि महानीच असते. तिच्या पुढें सार्वलौकिकी–कितीही मोठें आणि पर्यायेंकरून जास्त स्वहितदायक–कार्य अगदीं तुच्छ वाटतें. राघोबानें, आपल्या स्वतःच्या कल्याणाखातर, पेशव्यांचा अर्थात् मराठ्यांचा दरारा हिंदुस्थानावर बसविणाऱ्या या विंचुरकरांना विघ्न केलें !

मानवी स्वभाव आहे, गोष्ट खरी. पण व्यक्तिहित व मंडळहित यांतील महत्व कळून राजकीय पुरुषानें वागलें पाहिजे. आपल्याला एक चामड्याची वादी पाहिजे तर त्यासाठीं दुसऱ्याचा संबंध हल्या मारावयास मागेंपुढें न पाहणें यांतच काय ती "प्रपंचदक्षता" किंवा स्वकल्याणतत्परता ? दुर्दैव आमचें व आमच्या राष्ट्राचें कीं लहानपणांपासून आह्मांला परार्थपणा व ईश्वरसंबंधी प्रेमळ ज्ञान याची खरी आणि चांगली ओळख कोणींच आणि केव्हांही करून देण्याचा प्रयत्न केला नाहीं व करीत नाहीं. आणि आमच्या राष्ट्राला हल्लीं जें वैधव्य आलें आहे, आणि नरकयातना आमचें राष्ट्र भोगत आहे, याचें मुख्य कारणही हेंच कीं, महानीच स्वार्थ कीं ज्याला मूर्खपणानें प्रापंचिकपणा ह्मणतात तो प्रस्तुत आमच्यांत ओतप्रोत भरलेला आहे. आणि ईश्वरसंबंधी अतिमूर्ख व पाजीपणाच्या अशाच समजुती कैक आहेत. आपल्या एकट्याची बोलबाला चालावी, आपल्या हातीं अधिकार यावा आणि आपण कायते मुख्य असे लोकांनीं ह्मणावें, या हलकट दृष्टीनें राघोबासारखा रणधुरंधरयोद्धा आपल्या हातानें,

श्रीशिवाजी महाराजांनीं इतक्या हालाकष्टानें स्थापिलेल्या हिंदुपदपातशाहीवर धडधडीत विस्तव ठेवण्याला मागेंपुढें पहात नाहीं हें केवढें दुर्दैव ! आपल्या साऱ्या राष्ट्राच्या गमावलेल्या लौकिकास कमावण्याच्या कामांत विघ्न आणण्याला त्याला दिक्कत वाटत नाहीं, कदीम नौकर, बल्के हाडवैरी, धर्माची, देवाची, जातीची विडंबना करणारा, उपजत दुस्मन; पण त्याच्या वगलेंत शिरण्याला देखील राघोबाला शरम वाटेना ! ही स्वार्थबुद्धि एकदां प्रगट झाली ह्मणजे ती काय काय करावयास लावील याचा कांहीं नियम नाहीं. फार कशाला, इत्तीचे आह्मी मेंढरें झालों, वाघ असून गोगलगायी बनलों, सार्वभौम पदाचा उपभोग घेत स्वराज्याच्या अतिउच्च शिखरांवर स्वर्गलोकींच्या सुरांसारखें आनंदांत होतों, पण तेथून कवलांडून परदास्य व परकीयांच्या सत्तेंतल्या खोल दरींत कंगाल, भिकार, बंदेगुलाम होऊन विव्हळत पडलों, याचें कारण एकच. आणि तें आमच्यातील नीच, हलकट, अशी "स्वार्थपरायणता" अर्थात् तत्प्रीत्यर्थ आपसांतील कलह हें होय ! आणि या दुर्गुणाची मगरमिठी आह्मांस सोडवितां येत नाहीं तोंवर आहे यापेक्षां दुर्धरावस्थेस, हटकून आणि अतिवेगानें जाऊन पोंचूं यांत बिलकुल संशय नाहीं.

तेव्हां सारांश काय कीं, विठ्ठल शिवदेव आपल्या शत्रूला तुडविण्याच्या कामाकडे गुंतला होता, त्या अतिमहत्वाच्या कामाकडे बिलकुल लक्ष्य न देतां गृहकलहाग्नि माजविण्यासाठीं दक्षिणेंत तें काम तसेंच टाकून परत ये, ह्मणून राघोबानें त्यास बोलाविलें. आणि त्याप्रमाणें धन्याचा हुकूम ह्मणून विठ्ठल शिवदेवही येऊन दाखल झाले. इकडे माधवरावाच्या मनांतही स्वराज्यघातकी मंडळी कैद करण्याचें होतें. पण तें साधलें नाहीं. त्यांचा हा मनसुबा अगोदरच त्यांस कळल्यामुळें कीं काय,

कोण जाणे, त्या मंडळीनें आपला मोर्चा नासीकाकडे वळवून मोंगलाच्या—हैद्राबादकर नबाबाच्या प्रांतीं आपला तळ बसविला. हैद्राबादकर नबाब ह्मणजे पेशवाईच्या अगर हिंदुपदपातशाहीच्या नांवानें प्रथमपासून तिळांजुळी घेऊन बसलेला. त्याला मराठ्यांच्या स्वराज्याचें पुरें निसंतान करावयाचें होतें. सुमारें चाळीसएक वर्षें त्यानें वाटेल तितकी धडपड करून पाहिली, पण कांहीं कोठें डाव साधेना. जों जों मराठ्यांशीं सामना देण्याला यावें तों तों त्याचे हरवक्तीं चांगले दांतच पडत. पण त्याला ही संधि भारी पथ्यकारक अशी वाटली. **राघोबाला** औरंगाबादच्या सुभ्यानें लागेल तें सहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. सैन्य वाटेल तितकें कुमकेस घ्या ह्मणून सांगितलें आणि खुद्द नबाबसाहेब हैद्राबादेहून स्वतःचें सैन्य घेऊन **राघोबा**कडे यावयास निघाले. स्नेहच मोठा प्रेमळ पडला त्यानें तरी काय करावें ! **राघोबानें** एकावन लाखाचा मुलुख व कैक किल्ले निजामास देण्याचें कबूल केलें होतें. इकडे **राघोबानें** आपलें[१] ह्मणून सैन्यही जमा केलेंच होतें. अशा थाटानें हे काका आपल्या पुतण्याशीं लढाई देण्याकरितां सज्ज झाले ! मनुष्य

---

१ **राघोबानें** या निजामाच्या सहाय्याखेरीज आपली स्वतःची ह्मणून सिद्धता केली होती. **राघोबा** कर्ता मनुष्य, फौजेचा मुख्य अधिकारी, लढवय्या पटाईत, शूर खंदा आणि पेशव्यांचा सख्खा चुलता, **नानासाहेबांचा** बंधु व **बाजीरावाचा** पुत्र आणि स्वतंत्रपणें पुष्कळ कामकाजें व राज्यकारणें करणारा, तेव्हां त्याच्याकडे ओढा अनेकांचा असणें साहजीक आहे; तथापि पुतण्याविरुद्ध बंड उभारून राज्यपद मिळवावयाची त्यानें मसलत चालविली ती आपल्या मंडळीशीं काय करारावर हें समजण्यासाठीं **विठ्ठल शिवदेव** इत्यादिकांनीं या "बंडांत" सामील होण्यापूर्वी **राघोबा**कडून एक करार लिहून घेतला तो गाडगीळ यांच्या "विं-

एकदां का विवेकभ्रष्ट झाला ह्मणजे मग तो काय करील आणि

---

चुरकर घराण्याचा इतिहास'' नामक पुस्तकांतून येथें उतरून घेतला आहे.

१ "श्रीमंत राजेश्री भास्करराव आह्मांस धनी द्यावे. दिवाणगिरी नीळकंठ महादेव पुरंधरे यांस सांगावी. सखारामपंत यांनीं कारभार करावा. हल्लीं नारोशंकर व जिवनराव केशव हजर झाले. पुढें सरदार इकडे जे येतील त्यांशीं मुलूक लाऊन द्यावे. त्यांच्या सनदा द्याव्या. हुजुरांत खाजगी यांशीं महाल नेमून द्यावे. किल्ले देशचे व गंगथडीचे सुटतील ते जिमे लावून द्यावे. येणेंप्रमाणें करार करावा." हें त्यांचें लेखी मागणें आणि त्याला राघोबा लेखी लिहून देतात. "दिवाणगिरीचा कारभार नीळकंठ महादेव यांजकडे; त्याचा कारभार सखाराम भगवंत यांजकडे. करार वरकड लिहिल्याप्रमाणें कलमें करार. किल्ले सुटतील ते नीळकंठ महादेव व सखाराम भगवंत यांचे विचारें जिमेस लावून द्यावे. किल्ले त्र्यंबक व घोडप खाजगत चिरंजीवांकडे ठेवावे. येणेंप्रमाणें करार. चिरंजीव भास्करराव यांचे पायांशीं एकनिष्ठेनें वर्तणें व दौलत वाढेल तें करावें व ते थोर झालियावरी त्यांचे आज्ञेत वर्तावें तोंपर्यंत अखत्यार तुह्मांवर व तुह्मीं लिहल्याप्रमाणें सदहूप्रमाणें कलम करार."

२ "स्वामींनीं उमेद धरल्यावर पुण्याहून श्रीमंत बाई व रावसाहेब येतील. मोहो घालतील तो पडों न द्यावा; ते आप्ताविषयीं आड घालतील जे यांशीं हातीं द्यावें ती गोष्ट न ऐकावी. येविषयीं बेलभंडारा शपथपूर्वक द्यावा."

यांत राघोबाचा करार "उत्तम आहे. त्यांनीं आह्मांस सोडिलें असतां त्यांची भीड आह्मांस काय."

३ "आह्मां चौघांस फारकती द्यावी जे तुह्मांकडे सरकारचें लचांड कांहीं नाहीं. तुह्मीं हरएक मनसबा केला तरी तुह्मांकडे हरामखोरी नाहीं तुमचीं कर्जवामें सरकारांत बुडालीं आहेत दौ-

काय नाहीं याचा कांहींएक नियम नाहीं! राघोबा व त्याच्या तर्फेस जाऊन मिळालेली मंडळी भराभर सैन्य वाढवूं लागली.

---

लत उभी राहिली तरी तुमचें तुह्मीं घेणें अशीं पत्रें नीळकंठ महादेव, सखारामपंत, अंताजीपंताचे पुत्र नारोशंकर, विठ्ठल शिवदेव, जीवनराव केशव यांचीं." त्यावर राघोबांचा शेरा "येणेंप्रमाणें सहा पत्रें कलमरुजू पांचांजणांस द्यावीं."

४ "मुरादखान यांजला बोलावून त्यांची आमची गांठ घालून ऐक्यता करून द्यावी."

"येणेंप्रमाणें करार. मुरादखानाची व चौघां सरदारांची गांठ घालून दिली जाईल." हा राघोबाचा करार.

५ "राजेश्री जानोजी भोंसले याजला पत्रें पाठवून बोलावून त्याची व आमची गांठ घालून ऐक्यता करून द्यावी. तुह्मीं व आमचे सरदार एक होऊन राज्याचा बंदोबस्त करावा. याप्रमाणें सांगावें. आणि सरदार आले त्यांशीं पत्रें व महालकरी यांस पत्रें यादी तयार करून रवाना करावी."

"चिरंजीव भास्करराव व तुह्मीं व सर्व आह्मांकडील सरदार मिळून राज्याचा बंदोबस्त करणें ह्मणोन, पत्र घेणें व यादीप्रमाणें पत्रें दिलीं जातील. करार."

"येणेंप्रमाणें पांच कलमें करार. नर्मदातीरीं खाजगत खर्चाकडे करार. उत्तरतीर पंधरा कोस व दक्षिणतीर पंचवीस कोस दोन्हीं डोंगरांतील मुलूख खाजगत खर्चाकडे ठेवावा. वरकड मुलूख सुटेल तो चिरंजीव भास्करराव यांच्या सनदेप्रमाणें वांटून घ्यावा. सर्व बंदोबस्त करून खाजगत खर्चाचे जहागिरींत उपद्रव कांहीं करूं नये. येणेंप्रमाणें करार" असा राघोबाचा शेरा! एकंदरींत मनुष्य लोभाला एकदां गुंतला ह्मणजे त्याच्या आंगचे तमाम चांगले गुण मातीमोलच होतात. इंग्रजांच्या घरांत पेशवाई घालण्यास तयार झालेल्या दिवठ्याच्या हातून हा करार झाला तर यांत कांहीं विशेष नवल नव्हे!

विंचुरास सर्व मंडळी आपापलीं सैन्यें घेऊन आले. आणि मग एक चांगलासा मुहूर्त पाहून–राघोबादादा पेशवे, ज्यांची शौर्याबद्दल मोठी ख्याति, ज्यांचें नांव ऐकतांच दुस्मनाचा थरकांप होई, ज्यानें मराठ्यांचा भगवा झेंडा सर्व हिंदुस्थानभर थै थै थै नाचवीत अटकेवर नेऊन रोंविला, ज्याचे दखनी घोडे सिंधूनदींत न्हाले आणि ज्याची दौड शत्रूच्या कौतुकास पात्र होई तो–पुण्यप्रतापी पेशवेकुलदीपक **राघोबा**, निजामासारख्या कदीम दुस्मनाचें सहाय्य घेऊन आपल्या प्रत्यक्ष पुतण्याला समरांत गांठण्याकरितां निघाला ! इकडे **माधवरावा**नेंही आपली तयारी जारीनें चालवून असल्या घरभेद्या चुलत्यास आपले चार हात दाखविण्याचा निश्चय केला. तिकडून **राघोबा**चें आणि इकडून **माधवरावा**चें अशी सैन्यें समोरासमूर कुच करूं लागलीं. उभयतांची गांठ घोडनदीवरील **हिंगणी**मुक्कामीं पडली; तेव्हां उभय सैन्यें मोठ्या निकरानें लढूं लागलीं ! **माधवरावां**च्या सैन्याच्या कितीतरी पट अधिक सैन्य **राघोबा**चें होतें आणि मर्द मर्द ह्मणून नांवाजलेले व अनुभविक असे झाडून सारे शूर **राघोबा**च्या तर्फेचे. तथापि पेशवा **माधवराव** बिलकुल कचला नाहीं. तो धैर्याचा नगच–अगदीं अचळ–तशा त्या प्रसंगीं **माधवराव** मोठ्या निकरानें लढत होता. पण इतक्यांत पेशव्यांच्या सैन्याचें, **राघोबा**च्या अफाट सेनेपुढें कांहीं एक चालेना आणि खुद्द **माधवराव** पेशव्यांस **राघोबा**च्या सैन्यानें गराडा देऊन कैद केलें. **माधवराव** बसले होते तो हत्ती **राघोबा**च्या छावणीकडे वळविला. **माधवराव** पराकाष्ठेचा धैर्यवान् आणि भारी चतुर, आपणांवर प्रसंग जरासा करडा गुजरला असें पाहतांच अंबारींतून उतरून त्यानें **राघोबा**च्या पायांवर डोकें ठेवून ह्मटलें " काका, तुह्मी आ-

ह्मांस तीर्थरूपांच्या ठिकाणीं, वडील **नानासाहेब** आह्मांस टाकून गेले. सारा भरंवसा मी तुमचा धरला. आणि हल्लीं तर तुह्मीच माझ्यावर चालून येतां. वडील आहां. काय पारपत्य माझें करावयाचें तें करावें, करण्याचा अधिकार तुमचा आहे. घरांत कलह माजवून दुस्मनांना अशी फूस द्यावी यांत शहाणपणा कोणता आहे. लोक काय ह्मणतील. याकरितां हा मी आतां तुमच्या स्वाधीन झालों आहें, माझें काय करावयाचें तें करा. पण हात जोडतों, राज्यांत बखेडा माजवूं नका. पानिपतांत बुडालों आणि आतां असे चाळे करूं लागलों तर पुढें निभाव कसा लागेल ? स्वर्गीं वडील तुह्मांआह्मांस काय ह्मणतील ?" या भाषणानें **राघोबाचें** मन तेव्हांच कळकळलें. **राघोबा** मोठा दिलदार आणि भारी कोंवळ्या मनाचा सरदार. हें भाषण ऐकतांच त्याला अगदीं गहिंवर आला आणि हा वेळपर्यंत केलेल्या मनसुब्याचा त्याला सप्पाटून पश्चात्ताप झाला. पाठीवरून हात फिरवीत **राघोबानें** आपल्या पुतण्याचें पुष्कळ प्रकारें समाधान केलें आणि सांगितलें **माधवा** तूं असा कष्टी होऊं नकोस. माझ्याकडून पुनः असें आतां व्हावयाचें नाहीं. कांहीं काळजी करूं नको. चल आतां पुण्यास जाऊं. तेथें सर्व तुझ्या मनाप्रमाणें होईल. असें ह्मणून **राघोबा** व पेशवे एकदिल झाले. त्यांच्या मनांतील किंतु गेला. पण त्यांच्या पक्षाच्या मंडळीस फार संकट प्राप्त झालें. **माधवरावाचा** पक्ष घेऊन **राघोबांशीं** सामना द्यावयास आलेल्या मंडळीपैकीं **गोपाळराव पटवर्धनानें माधवरावांस** एकांतीं गांठून विचारिलें "आतां पुढें आमची वाट काय ? आह्मीं आतां काय करावें." त्याला **माधवराव** ह्मणाले "तूर्त वाट फुटेल तिकडे जाऊन सुरक्षित रहा. तुमची आठवण धरून पुढें मी तुह्मांस बोलावीन, काळजी

करूं नका, पण तूर्त कोठेंही जावें." त्याप्रमाणें त्यांनीं हैद्राबादकर नबाबाकडे जाण्याची तयारी केली.

इकडे हैद्राबादचा नबाब मोठें सैन्य घेऊन **राघोबाच्या** सैन्यास येऊन मिळणार होता तों इतक्यांत या चुलत्यापुतण्यांचा समेट झाला. या समेटामुळें मला मोठा आनंद झाला, असेंच सुखासमाधानानें रहा, यांत तुह्मां उभयतांचें आणि तुमच्या राज्याचें कल्याण आहे. असा वरपांगी थाट हैद्राबादच्या नबाबानें खूप उडविला, पण त्याचें मन भारी खट्टू झालें. उभयतांच्या कलहांत आपण आपला डाव साधून घ्यावा ही त्याची मसलत विनाकारण फोल झाली, याबद्दल त्याला फारच वाईट वाटणें अगदीं साहजीक आहे. पेशव्यांचा सूड घेण्याची संधि सांपडावी ह्मणून त्यानें जंग जंग पछाडलें पण कांहीं साधेना. त्याच्या हातांत आलेली शिकार नाहींशी झाली. तों इतक्यांत **माधवरावांच्या** तर्फेची **गोपाळ-**

---

१ हे **गोपाळराव पटवर्धन** निजामाकडेस सामील झाले ही गोष्ट **राघोबास** बिलकुल आवडली नाहीं. त्यांच्या या वरपांगी दिसणाऱ्या कृतघ्नतेचा सूड घ्यावा ह्मणून **राघोबानें** आपला मोर्चा मिरजेकडे वळविला. मिरज हें **गोपाळरावांचें** ठिकाण. तेथें **गोविंद हरी, गोपाळरावांचे** तीर्थरूप रहात असत. किल्ल्याची नासाडी करूं नये ह्मणून त्यांनीं **राघोबाची** पुष्कळ प्रकारें मनधरणी करून पाहिली पण तिचा कांहींच उपयोग होईना. **गोविंद हरींत** क्षात्रतेज फारसें नव्हतें. हरभटजींचा भटपणाच त्यांच्या हाडीं विशेषें खिळलेला, यामुळें त्यानें **राघोबाकडे** मध्यस्ती चालवून, आपणांस मंगळवेढ्याला तरी सुखरूप पोंचवा, एवढें, दीनवाण्या करुणा भाकीत मागणें मागितलें. तें **राघोबानें** मात्र मान्य केलें. आमच्या किल्ल्याची नासाडी करून विनंति कांहीं मान्य झाली नाहीं. मिरजकिल्ला हस्तगत केल्यावर तेथें **राघोबानें** लूट मांडिली आणि त्यामुळें पुष्कळांच्या मनांस धक्के बसले. **राघोबाचा** हा आज

**राव पटवर्धनादि** मंडळी निजामाचा आश्रय मागण्यास आले; तेव्हां त्याला थोडेंसें बरें वाटून त्यानें लगेच त्या मंडळीस आपल्याकडे घेतलें. **विठ्ठल सुंदर** ह्मणून नवाबाचा यावेळीं एक मुख्य दिवाण ब्राह्मण असे. त्यानें ह्मटलें कीं, ही पेशव्यांकडील मंडळी आपणांकडे येते हा एक मोठाच शुभ शकुन होय, त्यांस आपण आश्रय द्यावा यांत आपलें कल्याण आहे. आणि त्याप्रमाणें, **माधवरावांच्या** तर्फे **राघोबाशीं** वैर बांधणाऱ्या मंडळीपैकीं कित्येकांनीं निजामाचा आश्रय संपादिला. आणि तो निजामानें दिलाही. उभयतांत कलह लागल्याशिवाय तिसऱ्याचा फायदा होत नसतो.

**४ निजामाशीं सामना.** पानपतच्या रणकंदनांत मराठ्यांच्या सैन्याचा चांगला फडशा उडाला आहे, घरांत चुलतेपुतणे आपसांत भांडत आहेत आणि मातबर मातबर असे सरदार आपल्याकडे येऊन सामील होत आहेत तेव्हां ही संधि, पेशव्यांना एकदांचा चांगलासा हात दाखविण्याला मोठी उत्तम आली, असें निजामासारख्या कदीम दुस्मनास व हरवक्तीं पेशव्यांकडून नांक ठेंचत असलेल्यास वाटणें साहजीक आहे!

पेशव्यांचा प्रतापसूर्य उदयाला येण्याची वेळ आणि आपल्या यजमानास धाब्यावर बसवीत एका स्वतंत्रशा राज्याची स्थापना करण्याची निजामानें मांडलेली सुरुवात ही एकच होती. पण पेशव्यांनीं या निजामाची बिलकूल मात्रा कशी ती आजवर चालूंच दिली नाहीं. पेशव्यांशीं दंडेलगिरी निजामानें केली कीं त्याचा सूड हा पेशव्यांनीं सपाटून घेतलाच, असेंच हा वेळपर्यंत घडत असे. निजामानें नाहीं नाहीं ते भगीरथ प्रयत्न करून

---

दुसऱ्यावरील सूड उद्यां आपल्या वांट्यास येईल या भीतीनें आणखी बरेच लोक निजामाकडेस गेले.

पाहिले, सातारकरांच्या भाऊकींत शिरून कोल्हापुरकरांस चिथावून दिलें, ब्राह्मणमराठे यांच्यांत फूट पाडून पाहिली, पुतणेकाका यांच्या कलागतींत आपलें घोडें पुढें ढकललें, पण कांहीं केलें तरी पेशव्यांनीं ह्मणून निजामाची डाळ शिजूं दिली नाहीं. हरदम मराठ्यांपुढें आजवर आपलें नाक घांसण्याचेच निजामाला प्रसंग येत.

पण निजामाच्या महत्त्वाकांक्षेचा जोरही कांहीं निराळाच. इतक्यांदा खच्ची झाली तरी तिचा जोम कांहीं कमी होईना. आणि सध्यां आली आहे ही संधि फार नामी आणि फत्ते मिळाल्याशिवाय कदापि रहावयाची नाहीं असें निजामाच्या व त्याचा दिवाण **विठ्ठल सुंदर** याच्या मनानें घेतलें. तेव्हां **राघोबादादानें** औरंगाबादेचा सुभा मुरादखान याच्याशीं, **माधवरावांवर** चाल करून जाण्याच्या प्रसंगीं, करार केल्याप्रमाणें, किल्ले व मुलूख नबाबास मिळाले नव्हते. ते किल्ले व मुलूख हैद्राबादकरांस द्या असे **राघोबा** हुकूम देई पण तेथील कामदार कांहीं ते हुकूम मान्य करीतना. तेव्हां लढाई जुंपण्याला हें कारण नबाबास मोठें सबळ असें वाटून हैद्राबादेस, पुण्यावर चाल करण्याची, तयारी चालली. निजामाला नागपूरकर भोंसलेसुद्धां अनुकूळ झाले आणि मोठें जंगी सैन्य घेऊन निजाम, पेशव्यांवर चालून आला.

निजाम दंड ठोकून समरांगणीं उभा राहिला हें वर्तमान **राघोबास** ऐन वेळीं समजलें. शिवाय निजामाइतकी नव्हे त्याच्या निम्यानेंही यावेळीं फौज पेशव्यांकडे नव्हती. पण निजामाच्या हिम्मतीपेक्षां, धैर्यापेक्षां व युद्धकौशल्यापेक्षां दुप्पट हिम्मत, धैर्य आणि युद्धकौशल्य मराठ्यांत असे. निजाम चाल करून येत आहे असें कळतांच **राघोबानें** आपल्याजवळ होतें

नव्हतें तेवढें सैन्य जमा करून नबाबाच्या मुलखावर चाल केली. समोर उभें राहून सामना देण्याची ही वेळ नव्हे तर त्याच्या मुलखांत लुटालूट करून नबाबास इकडून तिकडे आणि तिकडून हिकडे खेळविण्यांतच त्याला जेरीस आणावें हा बेत **राघोबाचा**. त्याप्रमाणें त्यानें क्रम चालविला. **जनोजी** भोंसले नबाबास सामील ह्मणून त्याचा मुलूख लुटून जाळून **राघोबानें** फस्त केला. भोंसल्याच्या मुलुखांत आणि निजामाच्या राज्यांत फारच लुटालूट **राघोबानें** मांडली, ह्मणून त्याचा पाठलाग नबाबानें केला. **राघोबाची** दौड ह्मणजे अगदीं विलक्षण. तो एकदां भरारी मारूं लागला ह्मणजे कोणालाच ऐकावयाचा नाहीं. त्याच्यापुढें निजामासारख्याची प्राज्ञा काय ? समोर तोंड देऊन सामन्याला **राघोबा** येत नाहीं आणि त्याच्या दौडीपुढें तर आपला निभाव लागणें कठीण, तेव्हां पुढें आतां काय करावें अशी नबाबास पंचाईत येऊन पडली. **राघोबाच्या** मनांत हैद्राबादशहर–निजामाची राजधानी–तें लुटावयाचें फार होतें आणि त्याप्रमाणें आपला मोर्चा **राघोबानें** तिकडे वळविला. तेव्हां नबाबालाही वाटलें कीं, आतां आपण यांचें पुणेंशहर लुटावें. कारण, पाठलाग करण्याची आपली हिम्मत नाहीं आणि समोर सामना तर मराठे देत नाहींत.

निजाम, पुणें लुटावयास येणार हें ऐकतांच तेथील लोकांचें पण धाबें अगदीं दणाणून गेलें; कैकजण जीव बचावण्यासाठीं पुणें सोडून पळाले. उरलेसुरले त्यांस नबाबानें यथेच्छ लुटलें. पुणेंशहरभर निजामानें आगीचा डोंब उडविला. खुद्द पेशव्यांचा शनवारवाडा निजाम जाळणार पण तुळशीबागवाले यांनीं मुबलक खंडणी भरल्यामुळें तो वाडा बचावला. अशाप्रकारें नबाबानें पेशव्यांची राजधानी भर दिवसाढवळ्या उध्वस्त केली.

इकडे **राघोबास** हैद्राबाद कांहीं लुटतां आलें नाहीं. कारण त्या शहरची तटबंदीच तशी भक्कम. थोडाबहुत भाग लुटला. पण निजामानें पुण्याची दुर्दशा केली त्याच्या पन्नासाव्या हिशानें कांहीं राघोबाच्यानें हैद्राबादची करविली नाहीं ! पुणेंशहर राजधानीचें आणि तें लुटून जाळूनपोळून फस्त केल्याचें वर्तमान **माधवरा-वांस** लागलें, तेव्हां त्यांला फार दुःख झालें. **राघोबानें मा-धवरावांस** कैद करून आपल्या सैन्याबरोबरच नेलें होतें. यामुळें पुण्यास निजामानें मांडलेल्या नासाडीचा **माधवरावांस** सूड घेतां येईना. त्यांचा कांहींच इलाज चालेनासा झाला. **माधव-राव** महातेजस्वी पुरुष. त्याला आपल्या राजधानीची अशी नासाडी झालेली ऐकून संताप अति अनावर आला. पण बिचारा करणार काय ? **राघोबाच्या** कैदेंत अडकून पडला होता. तेव्हां त्याच्यानें कांहींच होण्याजोगें नव्हतें. पण तें दुःख मात्र त्याला असह्य झालें आणि त्या तिडकीसरशी तो आपल्या चुलत्याकडे जाऊन ह्मणाला, "काका ! दुस्मनानें आपलें राजधा-नीचें शहर लुटून जाळून फस्त केलें. या आपसांतील तंट्यानें आणखी पुढें काय काय होणार कोण जाणे ! पानिपतांत दुराण्यांनीं आमचा असा निःपात केला ! भाऊ, **विश्वासराव** ठार झाले ! त्यांचा सूड घेणें अजून आमच्या हातून होत नाहीं ! स्वर्गीं वडील तुह्मांआह्मांस काय ह्मणत असतील ! त्याची लाज नको का आह्मांला धरावयाला ? पानपतच्या लढाईंत ठार झाले त्यांच्या बायकांपोरांच्या डोळ्यांचें पाणी अजून खळलें नाहीं; धाय धाय तीं रडत आहेत, त्याचा वचपा तुह्मीआह्मी घेऊं ह्मणून त्यांना मोठी आशा वाटत आहे आणि आह्मी तर असे आपसांत भांडत बसलों !" हें भाषण ऐकून **राघोबाचेही** डोळे थोडेसे चटकन् उघडले. त्यानें ह्मटलें **माधवा** ! काळजी करूं नको.

आतां मी कांहीं आपसांत कलह करणार नाहीं. सर्व गोष्टी याउपर तुझ्या मनाप्रमाणेंच घडतील.

**५ राक्षसभुवनाची लढाई.**—आपसांतील कलहाचे परिणाम कोण भयंकर होतात व तसें कलह करीत बसल्यानें आपली नामोशी कशी होते हें **राघोबाच्या** निदर्शनास आलें. **माधवरावानें, राघोबा**पाशीं गोष्ट काढून आपले पटवर्धनादि सरदार निजामाकडे गेले होते त्यांना परत बोलाविण्याचा बेत नक्की ठरविला व त्यांना अभयपत्रें पाठविलीं, तेव्हां त्या मंडळीनेंही एकदम नबाबाचा पक्ष सोडून पेशव्यांकडे जाण्याचा मार्ग सुधरला. भोंसले–नागपूरकर, नबाबास जाऊन मिळाले होते तेव्हां त्यांचा मुलूख पेशव्यांनीं बराच लुटला आणि नबाबाकडून प्राप्ति होईल असें नागपूरकरांस वाटलें होतें तितकी झाली नाहीं तेव्हां तेही मनांतल्यामनांत बरेच खट्टू झाले होते. तेव्हां त्यांनाही **माधवरावानें** आपल्या पक्षाकडे घेतलें. इतका प्रकार होत आहे तों नबाब व त्याचे दिवाण **विठ्ठल सुंदर** हे गोदावरीच्या तीरीं आपलें सैन्य घेऊन पेशव्यांस टक्कर देण्याकरितां कंबर बांधीत होते. **राघोबा**ही यावेळीं त्वेषास बराच चढला होता. त्यानें निजामाशीं सामना दिला परंतु दुर्दैवानें त्याला त्यांत यश आलें नाहीं. **राघोबाचा** हत्ती नबाबाच्या लोकांनीं आपल्या सैन्यांत वळवून नेला. हें वर्तमान **माधवराव** कैदेंत होता तेथें त्याला कळलें. तें ऐकतांच त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. त्याच्या सभोंवतीं **राघोबाचे** पाहरेकरी स्वार होते त्यांना **माधवरावानें** मोठ्या दीनवाण्या पण त्वेषाच्या झटक्यांत म्हटलें अजूनी मी कैदेंतच का आहें ! त्यासरशी, सध्यां आलेला प्रसंग ओळखून त्या बाणेदार व स्वामिसेवापरायण स्वारांनीं सांगितलें, सरकार, आपण धनी खाविंद ! मालक अहां. आपणांस

कैद कोणाची ? हुकूम फर्मावा बंदे सेवेंत तयार आहों ! हें ऐ-कतांच **माधवरावास** दुप्पट हुरूप चढला ! त्यानें ह्मटलें तुह्मांला आपल्या जिवाची पर्वा नाहींना ? आजवर अन्न खाल्लेंत त्याचें चीज करण्याची ही आतां वेळ आली आहे. शिपाईबाणा मिरवितां तर दाखवा तुमच्या अंगीं काय करामत आहे ती ! आणि आतां मारा आपल्या घोड्यांस टांचा. तेव्हां लगेच ती पांचशें घोड्यांची मांड **राघोबानें माधवरावाच्या** पाहऱ्यासाठीं ठेविलेली, चवताळून दुस्मनांवर धांवून उठली. **माधवरावही** आपला घोडा अग्रभागीं घालून दांत ओंठ चावीत दुस्मनाच्या नरडीचा घोंट घेण्यासाठीं धांवला. तों इतक्यांत होळकर **मल्हारराव** त्याला वाटेंत भेटला. **राघोबाचा** हत्ती नबाबानें वळविला हें त्याला ठाऊक होतें. आणि झाला हा प्रकार बरा असें त्याला वाटून तो **माधवरावास** ह्मणाला "बाळा चलावें आतां आपण पुण्यास राज्य करूं" ह्मणजे **राघोबा** नबाबाच्या कैदेंत गेला ही ब्याद अनायासें टळली. औषधाविणें खोकला गेला ही समजूत होळकर **मल्हाररावाची**. पण **माधवराव** भारी मानी आणि मोठा तेजस्वी पुरुष. त्याला अशाप्रकारें आपल्या चुलत्याला दुस्मनांनीं कैद करणें कोठून खपावयाला ? शिवाय परार्थता हा गुण **माधवरावाच्यांत** बराच असे. केवळ नीच स्वार्थाला वश होऊन आपणांस नामोहरमी आणणाऱ्या कार्यांस कदापि उद्युक्त होणारा तो पेशवा नव्हता. आपल्या कुळाचा त्याला अभिमान जास्त असे. आणि आपल्या पश्चात् अकबरनविसांनीं आपल्याला वाईट ह्मणूं नये अशी त्याला प्रबळ इच्छा होती.[1] लौकिकाची चाड **माधवराव** चांगलीच बाळगीत असे

---

१ एकदां आपला धाकटा बंधु **नारायणराव** यास बरोबर घेऊन **माधवराव** एका टेंकडीवर हत्तीची टक्कर पहात बसले होते

यामुळें ही होळकराची सल्ला त्याला बिलकुल आवडली नाहीं. आवडली नाहीं इतकेंच नव्हे तर तशी नादान सल्ला दिल्याबद्दल घुस्सा आला ! **माधवरावानें** ह्मटलें “ काका—होळकरांस काका असें माधवराव ह्मणत असे, कारण उघडच आहे—मागें तुह्मीं भाऊसाहेबांना पानपतांत बुडविलें ह्मणून ऐकत होतों त्याचा प्रत्यय आज आला !” हें मर्मभेदक भाषण होळकराच्या मनास भारी लागलें. आणि लगेच त्यानें उत्तर केलें. “ बाळा ! तसें नाहीं. माझी समशेर तुला आतां दाखवितों पहावी!” आणि त्या ईर्षेनें वृद्ध **मल्हारराव होळकर**ही निजामावर तुटून पडला. **माधवरावांनीं**

---

तों इतक्यांत त्यांतील एक हत्ती चीं—चीं—करीत **माधवराव** व **नारायणराव** बसले होते तिकडे धांवत येऊं लागला. हें पाहतांच **नारायणरावा**ची गाळण झाली आणि तेथून आपण निसटावें ह्मणून **नारायणराव** लगबगीनें उठून दुसरीकडे जाऊं लागला. तेव्हां **माधवरावानें** त्याचा हात धरून खाली बसविलें आणि ह्मटलें **नारायणा !** तूं क्षात्रधर्म स्वीकारिला आहेस आणि शत्रूशीं झगडत जिवाची पर्वा न बाळगतां समरांगणीं मृत्यूच्या जबड्यांत शिरणाऱ्यांच्या पोटीं जन्मास आला आहेस, असें असतां बायकांसारखें जिवाच्या भीतीनें पळावयास लागलास याची तुला लाज वाटत नाहीं काय ? चल ये बैस येथें. चाललास कोठें? अखबरनीस तुझ्याबद्दल इतिहासांत काय लिहितील याची तरी लाज धर ! तेव्हां निरुपायास्तव **नारायणरावा**ला तेथें बसणें प्राप्त झालें व श्रीमंतांवर हत्ती चाल करून येतो असें पाहतांच एका शिपायानें पुढें होऊन आपली कट्यार त्याच्या सोंडेत भोंसकली. इत्यादि प्रकार कांहीं सांगण्याची गरज नाहीं. पण आपण जन्मलों कोठें, कोणाच्या पोटीं, आपल्यास करावयाचें आहे काय ? आणि आपल्यामागें कोण काय ह्मणतील याची चाड नाहीं, तर त्या मनुष्याच्या हातून होणार आहे काय ? याकरितां इकडे लक्ष्य अवश्य आणि हरवक्त असलें पाहिजे.

इतक्या निकरानें केलेला हल्ला निजामास असह्य झाला. खुद्द नबाबाचा हत्ती होता तेथवर लगट करीत **माधवराव** गेले आणि पहिल्या तडाक्यासरशीं त्यानें नबाबास कैद केलें! इकडे **विठ्ठल सुंदर** गोदावरीच्या पैलतीरास होता आणि अलीकडेही हुजूरएपुरनूर नबाबसाहेबांची स्वारी. त्यामुळें एकमेकांचें एकमेकांस कांहीं सहाय्य करितां आलें नाहीं. एकीकडून हुजूर नबाबावर **माधवरावांनीं** रोंख धरिला, तसा **विठ्ठल सुंदरांवर** मराठ्यांच्या इतर सैन्यानेंही धरिला. तिकडे **विठ्ठल सुंदर** अकस्मात् ठार झाला तों इकडे **माधवरावांनीं** खुद्द नबाबांस कैद करून ठेविलें! हा प्रसंग गोदावरी नदीच्या कांठीं **राक्षसभुवन** ह्मणून गांव आहे त्या ठिकाणीं घडला. ह्मणून **राक्षसभुवनाची** लढाई असें तिला ह्मणतात! पुढें निजामाचा व पेशव्यांचा तह झाला. आपल्या पुतण्याचें हें विलक्षण शौर्य पाहून **राघोबाला** आनंद झाला तो गगनांत मावेना. माझा **माधव** होता ह्मणून आजचा हा वाईट प्रसंग टळला आणि अशा माझ्या मुलाला मीं कैदेंत ठेवावें काय? आणि त्याच्याशीं कलह करण्यानें तरी मला काय मिळणार आहे? त्यांत माझाच कमीपणा व्यक्त होतो. तेव्हां अतःपर मी माझ्या **माधवाच्याच** धोरणानें वागेन, असा त्यानें निश्चय केला. निश्चय केला इतकेंच नव्हे, तर आनंदानें उल्हासित झालेल्या मुद्रेनें **राघोबा माधवरावांस** ह्मणाला "रावसाहेब! तूं चांगला कर्ता आणि मोठा शूर आहेस. पेशव्यांचें नांव तूं गाजविल्याशिवाय कदापि रहावयाचा नाहींस, अशी माझी बालंबाल खात्री झाली. आतां मी तुझ्या धोरणानेंच वागतों. तुझ्या कारभारांत मी ढवळाढवळ आतां कदापि करणार नाहीं."

आणि अशा प्रकारें गृहकलहाग्नीची ही पहिली ज्वाला थंडावली!

**६ कर्नाटकांतील मोहीम.** हैसूरचें हिंदुराज्य घशाखालीं उतरून धन्याशीं निमकहरामी करणारा **हैदर**अल्ली बराच प्रबळ झाला आणि तो आसपासच्या लहानमोठ्या संस्थानिकांना नाहक व्यर्थ गांजीत सुटला. हिंदुप्रजेचा तर त्यानें छळ करून त्यांजवर मोठा कहर गुजरविला. पेशव्यांचा मुलूख त्याच्या सरहद्दीवर होता तेव्हां त्या मुलुखांतील लोकांसही या हैदरनायकाचा हरवक्त उपद्रव पोंचत असेच. इतक्यांत सावनूरच्या नबाबांवर या हैदरनायकाची वक्रदृष्टि फिरली. त्याला अजीबाद साफ बुडविण्याचा मानस हदैराचा होता. सावनूरकर बिचारा लहानसा नबाब. त्याच्यावर हैदरनायकाची धोंड कोसळली ह्मणजे तो वांचेल असा प्रकार मुळींच नव्हता. असें त्या बिचाऱ्यावर संकट गुदरलें. आतां पुढें काय करावें, कोणाला शरण जावें ही त्याला विवंचना लागली. तों इतक्यांत त्याला कोणीं त्याच्या दरबारच्या मुत्सद्यानें सुचविलें कीं, यावेळीं आपलें रक्षण करण्यास आणि हैदराला पुरून उरणारे असे एक श्रीमंत पेशवे आहेत, त्यांच्या खेरीज दुसरा त्राता दिसत नाहीं. शिवाय त्यांनाही हैदरनाइकांचें पारिपत्य करण्याचें आहे. ही संधि अशाप्रकारें उत्तम आहे, तर त्यांना शरण जावें, त्याप्रमाणें 'माझें रक्षण करा, मजवर महाबलाढ्य परचक्र आलें आहे, तुह्मांखेरीज मजला कोणी त्राता नाहीं, अशाप्रकारें सावनूरकरांनीं **माधवरावां**कडे बोलणें लाविलें. **माधवरावां**लाही हैदरावर जाण्याला प्रसंग आणि संधि हवी होतीच, ती अशाप्रकारें अनायासें आली. तुह्मी घाबरू नका, तुमचें संरक्षण आह्मी करितों. तुमच्या शत्रूंशीं सामना द्यावयाकरितां आह्मी आतां निघालोंच. असें सांगून **माधवरावांनीं** कर्नाटकांतील मोहिमेची जारीनें तयारी चालविली. पण

इ. स. १७६४–६६

**राघोबाच्या** मनांत आपण त्या मोहिमेवर जावें असें होतें. आणि **माधवरावांला** वाटे, आपण दुस्मनाला एकदां समशेर दाखवावी. अशाखालीं कांहीं दिवस जाऊं लागले ह्मणून पटवर्धन व रास्ते यांस **माधवरावांनीं** पुढें कुच करा ह्मणून फर्माविलें. तुमच्या पाठोपाठ मी येतोंच असें **माधवरावांनीं** त्यांना आश्वासन दिलें. पटवर्धन जाऊन तिकडे दाखल होतात न होतात तों इकडे सावनूरकराला दम बिलकुल निघेना ह्मणून—पेशवे केव्हां येणार आणि आपलें संकट केव्हां निवारण होणार याकरितां—हैदराच्याच पाठीशीं आपण दडावें हें सावनूरकरास बरें वाटलें. सावनूरकरानें आपला वकील हैदराकडे पाठविला न पाठविला तोंच अघाडीस निघालेलें पेशव्यांचें सैन्य हैदराशीं सामना करण्यासाठीं दाखल झालें. त्यांना सावनूरकराचें हें करणें बिलकुल आवडलें नाहीं. आह्मांला पुढें असें आणून आतां हैदराकडे वकील पाठविलात हें आह्मांला बिलकुल खपावयाचें नाहीं. एक दोन दिवसांत खासे हुजूर येथें दाखल होतील, त्यांना हें तुमचें दुटप्पी वर्तन कळलें तर तुह्मां दोघांसही तेव्हांच ते बुडवतील. करितां आतांच्या आतां तुह्मी आपल्या वकिलास परत बोलवा, अशी निकड पटवर्धनांनीं सावनूरकरास लाविली; आणि निरुपायास्तव सावनूरकराला आपला वकील परत बोलावणें भाग पडलें. सावनूरकराकडील वकील परत आला तरी **माधवरावांच्या** येण्याचा ठिकाणा लागेना. आपणावर मराठे चाल करून येताहेत, अघाडीची फौज येऊन दाखल सुद्धां झाली, हें हैदरास कळल्यामुळें तो सावध होऊन आपल्या जागीं लढाईची तयारी जारीनें करूं लागला.

इकडे **राघोबांच्या** व **माधवरावांच्या** तक्रारीमुळें चार दोन दिवस **माधवरावांस** निघावयाला उशीर झाला. इतक्यांत

**विठ्ठल शिवदेव विंचूरकर** आणि **माधवराव** यांच्यांत एक दोन खटले झाले. मागें आपणांविरुद्ध **राघोबा** सैन्य जमवून युद्धास यावयाला सिद्ध झाले होते, त्या कामीं **विठ्ठल शिवदेव** प्रमुख असत. तेव्हां तो दंश **माधवरावांच्या** मनांत सारखा राहिला होता. आज ना उद्यां, **विठ्ठलरावांचें** पारिपत्य करावें हा निर्धार **माधवरावांचा** होता; पण प्रसंग येईना. इतक्यांत विंचूरकरांच्या आणि पेशव्यांच्या शिपायांत कांहीं क्षुल्लक कारणावरून थोडीशी मारामारी झाली. ती **माधवरावास** समजतांच त्यानें **विठ्ठलरावांचा** गोट लुटावा असा हुकूम केला ! **विठ्ठल शिवदेव बाजीरावापासून** पेशव्यांच्या पदरचा मातबर मर्द सरदार आणि त्यांतून कडवाही तसाच. तो स्वस्थ बसून गोट लुटूं द्यावयाचा थोडाच. त्याला श्रीमंतांनीं असा हुकूम फर्मावल्याची वर्दी कळली मात्र, तों लगेच नंग्यासमशेरी चमकावीत पांच हजार शिपायांनिशीं, कोण कसा माझा गोट लुटावयास येतो पाहूंदे ह्मणत **विठ्ठल शिवदेव** उभे राहिले. त्यावेळीं **मल्हारराव होळकर** कर्नाटकांतील मोहिमेवर जाण्यास्तव पुण्यास आले, त्यांना हें वर्तमान कळलें. हातांत हात घालून होळकर व विंचूरकर यांनीं हिंदुस्थानांतल्या कैक मोहिमा फत्ते केलेल्या. **विठ्ठलराव** ह्मणजे पराकाष्ठेचा शूर व करारी शिपाई हें त्याला ठाऊक. उभयतांत स्नेहही अप्रतिम. तेव्हां असा प्रसंग आलेला पाहून त्याला अतिशय वाईट वाटलें. तेव्हां **मल्हारराव** तसाच तडक **माधवरावांकडे** गेला आणि ह्मणाला, बाळा हें तूं काय आरंभलें आहेस ? **विठ्ठल शिवदेव** काय तूं कमी शूर समजतोस ? तुझ्या आज्यापासून त्यानें शिपाईपणांत तुमच्या गादीची इतकी नेकजातपणानें नोकरी केली त्याचें का हें तूं त्यांना बक्षीस देतोस ! तूं वेडा आहेस. तुझें दहा हजार सैन्य ख-

रात्र होईल तेव्हां **विठ्ठल शिवदेवाच्या** गोटांत शिरकाव व्हावयाचा, हें तूं पक्कें समज. तुला **विठ्ठल शिवदेवाचें** पारिपत्य करावयाचें असेल तर कर्नाटकाच्या मोहिमेस निघाला आहेस तेथें अघाडीला त्यांना पाठीव ह्मणजे झालें. आणखी हा प्रसंग असा घरांत खलेली करण्याचा नव्हे. हे **मल्हाररावांचें** ह्मणणें **माधवरावांस** रुचलें; पण आपण हुकूम देऊन चुकलों, पुढें आतां कशी दिलसफाई व्हावी असें त्यानें **मल्हाररावांस** विचारिलें. तेव्हां त्याची कां तूं काळजी करतोस. मी तुझ्या पायांवर त्यांना आणून घालितों. असें ह्मणून विंचूरकरांकडे **मल्हारराव** गेले आणि त्याचा दंड धरून ह्मणाले, आतां ह्मातारपणीं हें काय तुह्मीं आरंभिलें आहे? तुह्मी कदीम नोकर. **बाजीरावाच्या** वेळेपासून तीन डोया धन्याची नोकरी अगदीं इमानेंइतबारें करून अखेर अशी का साधणार? **माधवराव** मूल आहे, आणि तुह्मी ह्मातारे झालांत. लोक तुह्मांला बोल लावतील. चला तुमचा आणि श्रीमंतांचा सलोखा करवितों. असें ह्मणून वळेंच **माधवरावांकडे** **विठ्ठल शिवदेवास** **मल्हारराव** घेऊन गेले. तेथें उभयतांचीं बोलणींचालणीं होऊन सलोखा झाला.[१]

अशाप्रकारें **माधवराव**, विंचूरकर, ह्यांचें हें सख्य कळतांच

---

१ **माधवरावाचें** व **विठ्ठल शिवदेवाचें** मनोमनीं नीट नव्हतें हें वर्तमान **विठ्ठलरावांनीं** **राघोबांस** पत्रद्वारें कळविलें तेव्हां **राघोबांनीं** खदस्तूरचें पत्र **विठ्ठलरावांस** पाठविलें कीं, " विनंती उपरी चिठ्ठी पाठविली ती पावली. किरकोळ कज्यासाठीं उदासपणें लिहिलें तरी असें तुह्मीं न करावें व चिरंजीवही करणार नाहींत. किरकोळ मजकुरासाठीं वाईट दाखवावें हें काय? असे कज्यासाठीं दुतर्फे सांड असावी. मी चिरंजीवांसही सांगून पाठवितों. तुह्मींही उदास न होणें हे विनंती"!

होळकर, पटवर्धन, रास्ते इत्यादि सरदार हैदरची खोड मोडण्याच्या हेतूनें कर्नाटकांत शिरले. तों इकडे **हैदर** अनवतीनामक मोठ्या मजबूत ठिकाणीं "**वीस हजार कवायती** पलटणी लोक" ( ग्रांटडफ ह्मणतात ) घेऊन पेशव्यांशीं सामना देण्याची वाट पहात होता. मराठ्यांचें सैन्य बिनकवायती आणि अगदीं थोडें. शिवाय हैदरची जागा अगदीं निबिड अरण्यांत व मोठ्या वळकट अशा ठिकाणीं होती. प्रांत कर्नाटक, भाषा कानडी, मुलूख डोंगराळ व अगदीं अरण्यमय. शत्रु—मोठे कडवे ह्मणून नाणावलेल्या शिपायांचा—स्वतःच्या हिम्मतीवर नबाब बनलेला. त्याचें सैन्य कवायती आणि दुपटीपेक्षां जास्त. तेव्हां आतां पुढें कसें करावें हा विचार पेशव्यांस पडला. कोणी ह्मणत, तूर्तच्या प्रसंगाला माघार खाऊन मग पुढें मोकाबिला करण्याचा विचार पाहावा. ही सल्ला **सखारामबापूंची.** ती कांहीं या तरुण पेशव्यास रुचेना. त्याला तसें करणें मरणापेक्षां ओखट वाटे. शत्रूवर चाल करून जावें मग काय घडावयाचें तें घडेल हा निर्धार त्याचा. खण्पामर्जी झालेले **विठ्ठल शिवदेव** यांनीं सल्ला दिला, यांत काय इतकी काळजी ? आपण हैदराला तुडवून टाकूं ! हुकूम फर्मावा आणि करामत पहा ! **माधवरावांस**

---

१ या कर्नाटकाच्या मोहिमेचें वर्णन, गाडगीळ यांनीं लिहिलेल्या विंचूरकरांच्या घराण्यांच्या इतिहासांत व सहस्रबुद्धे यांच्या सरदार पटवर्धननामक भाऊंच्या चरित्रांत बरेंच विस्तारें करून दिलेलें आहे. पण मौज ही की सहस्रबुद्धे बहुतेक यश पटवर्धनांकडे अर्पितात आणि गाडगीळ विंचूरकरांकडे ! ह्मणजे प्रत्येक पुराणांत त्या त्या विशिष्टदेवतेचेंच सर्वांत अधिक महात्म्य वर्णिलें असतें. अशांतला प्रकार इतिहासग्रंथांतही होऊं लागला ह्मणावयाचा आणि असें झालें ह्मणजे इतिहास या दृष्टीनें त्या ग्रंथाची योग्यता काय हें ग्रंथकारांस नाहीं तरी चाणाक्ष वाचकांस तेव्हांच कळतें !

ही सल्ला मनापासून रुचली. सल्ला रुचली पण निभाव लागणें महाकठीण कर्म असें त्यासही वाटे. पण करितो काय ईर्षा जबरदस्त पडली. खांसा स्वारी मोहिमेवर येऊन परत गेली या अपयशापेक्षां समरांगणचा मृत्यु त्याला भारी प्यार वाटे. तेजस्वी पुरुष असतात ते असल्या अचाट कृत्यांस प्रवृत्त होऊन महायश संपादतात याचें कारण, 'तें कार्य आपल्या हातून झालें नाहीं' असें ह्मणवून घेणें त्यांना मरणापेक्षां दुस्सह वाटतें हेंच होय!

हैदर तर येवढ्या बलाढ्य सैन्यानिशीं अगदीं सुरक्षित अशा ठिकाणीं दबा धरून बसला आहे. तेव्हां कसें तरी करून तो येथली जागा हालवील असें केलें पाहिजे, हा **माधवरावांचा** निश्चय आणि त्याप्रमाणें हैदराच्या आसपासच्या मुलुखीं बसविलेलीं नवीन ठाणीं उठविण्याच्या आपण नादास लागावें ह्मणजे आपोआप तो तें ठाणें सोडून पुढें येईल ही त्यानें युक्ति योजिली.[1]

---

१ आंग्लशिपाई क्लैव यानें अर्काटच्या वेढ्यांत अशाप्रकारची सल्ला योजिली व त्रिचनापल्लीहून नवाबास काढिलें यासंबंधानें त्याचें स्तुतिस्तोत्र गातां गातां कैक इतिहासकारांचे कंठ अगदीं कोरडे पडले आहेत. **माधवरावांची** ही सल्ला क्लैवइतकीच किंबहुना कांकणभर अधिक शहाणपणाची नव्हे काय? पण त्याचें स्तुतिस्तोत्र गातो आहे कोण? आणि हें ठाऊक तरी कोणाला आहे? सारा ताज्या घोड्याच्या गोमाशीपणाचा बाजार भरला आहे झालें! आपल्यांतील थोर पुरुषांचें गुणवर्णन व त्याचें कौतुक करणें हें कांहीं लहानसान "देशकाज" नव्हे! कीर्तीसाठीं जो तो हपापलेलाच असतो. मला माझ्यामागें लोक च्छी: थू: करतील या भीतीनें कैकजण दुष्कृत्यापासून परावर्त होऊन सत्कृत्याप्रीत्यर्थ "देह जावो अथवा राहो" अशी त्याची भावना होते त्याचेंही कारण हेंच. जगून तरी काय करावयाचें, मरून चार वर्षें लोकांच्या तोंडीं नांव

हैदर कांहीं अशातशांतला नव्हे. **माधवरावां**पेक्षां १०।१५ उन्हाळे त्यानें जास्त पाहिलेले. शत्रूची ही मसलत त्याच्या चटकन् ध्यानांत आली, तेव्हां "जशास तसें" करण्याच्या हेतूनें त्यानें अशी युक्ति लढविली कीं, आपण भीतीनें पिछेहाट घेतों असें दाखवीत शत्रूला अंगावर घ्यावें आणि मग एकदम उलटून त्याचा पुरा नक्षाच उतरावा. ही हैदराची मसलत **माधवरावांच्या** ध्यानांत पुरी उतरली तेव्हां तो त्याला बधणार आहे थोडाच. आपणच मागें पळता पाय घेऊन शत्रूला अंगावर चवताळूं द्यावें आणि मग नोका साधून ठोकावें असें **माधवरावांनीं** ठरविलें. अशी गांठ ठकाठकाची पडली तेव्हां त्याचें वर्म कळणार आहे कोणाला ? आतां आपला निभाव लागत नाहीं आणि भीतीनें पूर्ण गांगरलों आहों, असा बाहणा करून, मराठे, समरांतून माघारीं पाय काढूं लागले, तेव्हां त्यांचा तो कावा यावेळीं कांहीं हैदरअल्लीस कळला नाहीं. त्याला वाटलें, खरेखुरेच मराठे भीतीनें पळूं लागले आणि ह्मणून हैदरनाईक आपली सुरक्षित जागा सोडून मराठ्यांचा पाठलाग करूं लागला. सुरक्षित जागेतून पुढें चांगला आपल्या कह्यांत हैदर आला असें पाहतांच **माधवरावानें** चटकन् उलट खाऊन आपल्या सै-

---

गाजवावें ही लालसा, जर कौतुक मानणारे आणि कीर्ति गाणारेच नाहींत तर उत्पन्न व्हावी कशी ? हल्लींच्या काळीं देशसुखार्थ व परोपकारार्थ फारशीं कृत्यें घडत नाहींत याचें खरें कारण लोक त्याचें कौतुक मानीत नाहींत व त्याची कीर्ति गात नाहींत हेंच होय ! साहेब, साहेबाची नौकरी याचें कौतुक घरादारांत माजतें, तिकडे लोक हपापलेले आहेत ! ह्मणजे सारांश तो इतकाच कीं गुणांचें चीज करणें अर्थात कौतुक मानणें हें एकप्रकारचें उत्तम उत्तेजन आहे आणि त्याचा अभाव पुरा सोळाआणे आमच्याकडे आहे ह्मणूनच हवीतशीं माणसें—परार्थपर माणसें—निपजत नाहींत.

त्याचा हैदराच्या सभोंवतीं गराडा दिला ! जातीनें माधवराव घोड्यावर बसून आपला घोडा अगदीं पुढें फेंकीत युद्ध चालवीत होता ; यामुळें त्याच्या सैन्याला हा एकप्रकारचा विलक्षण आवेश आला. धनी समक्ष हजर आहेत, कायती आपली करामत याप्रसंगीं दाखविली तर अर्थात त्याचें चीज होईल अशी प्रत्येकास ईर्षा चढली ! एकीकडे विंचूरकर विठ्ठल शिवदेव होते त्यांना काय वाटलें कीं श्रीमंतांची आधींच आपणांवर खप्पा मर्जी आहे, या अशा वेळीं आपण आपलें शौर्य दाखविलें तर त्यांची आपणांवर बहाल मर्जी झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं. आपल्या समशेरीची त्याला फत्ते माहीत नाहीं त्यामुळें त्याचा आपणांवर असा दांत आहे, तर, आज दोन पिढ्या बजाविलेल्या स्वामिसेवेची अखेर येथें आहे. जगून तरी काय करावयाचें, श्रीमंतांपुढें समरांगणांत कत्तल झालों तर त्यांत आपल्या जन्माचें तरी सार्थक होईल. या ईर्षेनें विठ्ठल शिवदेव हैदरअल्लीच्या तोफखान्यावरच थेट चालून गेले. कवायती लोकांच्या देखरेखीखालीं हैदरनाइकाचे लोक मोठ्या आवेशानें आपल्या तोफा डागीत होते, त्यामुळें माधवरावांचें सैन्य फार हैराण होऊं लागलें. तों इतक्यांत "जयनरहरी जयनरहरी" असा निकराचा जयघोष करीत विठ्ठल शिवदेव थेट तोफखान्यावर तुटून पडले. इकडे दुसऱ्या बाजूस "मोरया ! मोरया !" असा गजर उडवीत पटवर्धन मंडळीनें आपल्या मर्दपणाची शर्थ चालविली ! प्रतिभीष्माचार्य परशुरामभाऊ पटवर्धन याप्रसंगीं होते त्यांना चेव कांहीं विलक्षणच आला होता. हुजुरातीच्या सैन्याला वाटे मुसलमानांशीं आज गांठ पडली आहे, अनायासें पानपतचा सूड अंशतः तरी घेऊं; अशा निकरानें "हर हर महादेव ! हर हर महादेव" ! अशी गर्जना करीत जोरजोरानें शत्रूंवर तु-

टून पडूं लागले ! तरुण पेशवा **माधवराव** आपला घोडा इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फेंकीत, मध्यें आपणही बंदुका झाडीत आणि वरचेवर भले शाबास ! मारा ! हाणा ! ठोका ! उडवा ! घाबरूं नका, शत्रु आला आपल्या पेंचांत ! असें उत्तेजन देत बिजलीसारखे चमकत फिरत होते. असें मोठें निकराचें हें युद्ध माजून राहिलें. हैदरअल्लीची पुरी गाळण उडाली. चोंहोंकडून सारखा त्याच्या सैन्यावर मारा चाललेला. इतक्यांत विंचूरकरांनीं जाऊन त्याचा तोफखाना बंद पाडला. मागें फिरावयास जागा नाहीं, पुढें सरकतां येईना असें त्याला मराठ्यांनीं कोंडून सोडलें ! तेव्हां हैदर गाईसारखा दीन होऊन 'बस्स आतां पुरे झालें ! माझ्यानें हा मारा आतां सहन करवत नाहीं, तह करितों, मला जिवंत ठेवा.' असें त्यानें पेशव्यांस सांगून पाठविलें.

मराठ्यांना हैदरावर पुरा जय मिळाला. सारी सेना जयोत्सवांत दंग झाली. त्यांचा आनंदसागर उचंबळूं लागला. आपण कृतार्थ झालों असें **माधवरावांस** वाटलें. पटवर्धन विंचूरकर यांना आपल्या धन्यानें समक्ष आपली करामत पाहिली तेव्हां आपण आज धन्य आहोंत असें वाटलें तर त्यांत नवल कोणतें ? विंचूरकरांनीं तोफेच्या डोंबांत शिरून त्या, शत्रूंकडून हिसकावून घेण्याचें विलक्षण धाडस केलें तें पाहून **माधवरावाला** फार आश्चर्य वाटलें. त्याच्या शौर्यापुढें तो अगदीं थक्क झाला. युद्ध संपतांच **माधवराव** जातीनें **विठ्ठलरावांच्या** डेऱ्यास गेले आणि ह्मणाले, **विठ्ठलराव,** आजचें सारें यश तुमच्या पराक्रमाचें होय ! तुह्मी आज होतां ह्मणून मी ही आनंदाची वेळ पाहिली ! हे **माधवरावांचे** शब्द ऐकून **विठ्ठलरावांला** फार समाधान वाटलें आणि आज आपल्या जन्माचें

खरें सार्थक वाटून धन्यता मिळविली असें त्यांना झालें. तोच प्रकार पटवर्धन मंडळीचा.

असो. सारांश इतकाच कीं, हैदरखानाशीं मराठ्यांनीं मोठ्या निकराचें युद्ध करून चांगला जय मिळविला ! **माधवरावांनीं** आपल्या आंगचें शौर्य आणि युद्धकौशल्य केवढें अप्रतिम आहे याची खात्री परभारें दिनदुनयेस करून दिली. आतां पुढें तह ठरावयाचा राहिला. आपली आणि काकांची या स्वारीसंबंधानें थोडीशी प्रारंभींच बोलाचाली झाली आहे आणि सांप्रत ते आपणांवर किंचित रुष्ट झाले आहेत तेव्हां त्यांच्याच हातें हा तह करवावा ह्मणजे त्यांना मोठेपणा मिळून आपलाही कार्यभाग होईल, ही सल्ला **माधवरावांनीं** योजिली. ती वास्तविक पाहतां खरोखर मोठ्या थोरपणाची, शाहाणपणाची आणि राज्यकार्यधुरंधरतेची अशीच होती. चुलत्याचें मन सुप्रसन्न होतें, घरांतील कलहाग्नी शमतो, आपला पुत्रधर्म गाजतो, चुलत्याला अनायारें मोठेपणा दिल्यानें आपल्याकडे तो जास्त येतो, इतकीं धोरणे यांत साधलीं गेलीं. तरुणपणाची हुंबाडी अहंपणावर भारी असते तीही यांत नाहीं, तेव्हां **माधवरावांचें** हें करणें खरोखर भारी शहाणपणाचें यांत कांहींएक शंका नाहीं. आणि त्या

१ पण "हिंदुस्थानकथारसाचे" कर्ते यासंबंधानें लिहितात "हैदरास मीं इतकें जेर केलें आहे. आतां पुढचें काम आपण पूर्ण करावें. या निरोपावरून **माधवरावांच्या** मनाचें **मोठेपण**" (शहाणपण किंवा व्यवहारकौशल्य वगैरे कांहींएक नाहीं.) "दिसून येतें. पण असें आचरण **राजनीतीस बरें नव्हे.** आपण कष्ट सोसावे आणि यश दुसऱ्यांस द्यावें ही रीत साधुजनांस मात्र योग्य आहे. हें **माधवरावांच्या** लक्षांत आलें नाहीं." वेडेच ते. त्यांला कोठून इतकी अक्कल सुचावयाला ? पण या "रस"कारांस प्रश्न इतकाच कीं "**राजनीतीस**" **माधवरावांचें** हें

प्रमाणें राघोबांस, आतां आपण येऊन हैदरनायकाशीं तह करावा असें पत्र लिहिलें. त्याप्रमाणें **माधवरावांनीं** आमचे तीर्थस्वरूप येऊन तहाचीं कलमें ठरवतील असें हैदरास कळविलें. इकडे आपल्या पुतण्यानें आपला इतका मान ठेविला ह्मणून राघोबांचा आनंद गगनांत मावेना. तसेंच किती चुलत्यापुतण्यांची सरळ वर्तणूक, केवढा वडिलांचा हा दरारा असें आश्चर्य हैदरअल्लीस वाटून तो आधींच दबला होता.

**७ शिळ्या कढीला ऊतः**--तह ठरण्याचें मुकरर झालें आहे तेव्हां काका येत तोंपर्यंत आपण येथेंच तळ देऊन रहावें असें **माधवरावांनीं** ठरविलें. जयोत्सवांत दंग झालेल्या सैन्यास त्या वेळीं कांहींएक काम नव्हतें. तेव्हां त्यांनीं हैदर बळकट व मजबूद जागा धरून बसला होता त्या अन्नवतीनगरांतून व जंगलांतून जंगल तोडून सरळ वाट काढण्याची त्या सैन्यानें सुरवात केली. त्या रानांतून वर्षा उतरण्याची सोय चांगली असेल हा त्या लष्कराचा तर्क, यापलीकडे त्याचा फारसा हेतु

---

करणें बरें नव्हतें असें आपण कशावरून ह्मणतां? त्यांत तर राजनीति, पुत्रधर्म जास्त प्रगट झाला नाहीं का? असो. त्यांत कांहीं अर्थ नाहीं. मराठ्यांचे इतिहासकार इंग्रज ग्रांटडफ यांनीं याच प्रसंगासंबंधानें असें लिहिलें आहे "माधवरावांनीं आपल्या काकांस निरोप पाठविला कीं, 'आपण येऊन हें काम शेवटास न्यावें;' यांत त्या माधवरावांची परमसुशीलता प्रगट झाली पण ती राजनीति नव्हे; कां कीं आपणांस यश येत असतां त्याचा अधिकारी दुसऱ्यांस करणें हें साधुमार्गास फार योग्य आहे आणि राजास तर अहितच," तेव्हां स्पष्टपणें जरी रा. **ओकांनीं** उल्लेख केला नाहीं तरी त्यांनीं डफसाहेबांच्या मताला आपला हात लाविला किंवा "मम" ह्मटलें इतकें खरें दिसतें. तेव्हां त्यांना तरी त्याचा बोल कां लावावा?

नसावा. आणि आपण तह होईपर्यंत ठाणें घालूं ती जागा, राखवेल तितकी सुरक्षित राखण्याचा मराठ्यांनीं यत्न केला तर त्यांत गैरही ह्मणण्यासारखें कांहीं नाहीं. कारण दुस्मनाच्या मुलुखांत बेसावधपणानें रहाणें धोक्याचें. कोणत्या वेळीं काय व कसा दगा होईल याचा नेम नसतो. पण हें त्यांचें करणें हैदरअल्लीस आवडलें नाहीं. तो ताज्या दमाचें सैन्य घेऊन पुनः मराठ्यांशीं लढावयास आला. पण तो शिळ्या कढीचा ऊत किती वेळ टिकणार? पहिल्या तडाख्यासरशीं त्यांनीं चीं, चीं, चीं, करीत पळावयाचा वखत हैदरअल्लीवर आणून सोडला! तेव्हां तहाचें बोलणें हैदरअल्लीनें पुनः सुरू केलें. इतक्यांत राघोबा येऊन तेथें दाखल झाला. त्याच्याशीं हैदराचे वकील वाटाघाट करूं लागले. लढाईच्या खर्चाबद्दल ३२ लाख रुपये हैदरानें रोख पेशव्यांस द्यावे; सावनूरच्या नबाबापासून खंडणी वगैरे कांहीं एक न घेतां त्याला स्वस्थ राहूं द्यावें; आणि संताजी घोरपड्यांचा वंशज मुरारराव घोरपडा, माधवरावांकडे नुक्ताच येऊन मिळाला व त्याच्या पूर्वजांचे मराठी राज्यावरील उपकार स्मरून माधवरावांनीं, त्याला, पूर्वापार चालत आलेली त्याच्या घराण्याची सेनापति पदवी त्याला देऊन मोठ्या इतमामानें त्याचा आदरसत्कार केला होता, तेव्हां त्याचा पुष्कळ मुलूख जो हैदरानें घेतला होता तो त्याचा त्याला परत द्यावा. या अटी राघोबानें सांगितल्या. त्या निमूटपणें हैदरास मान्य करणें भाग पडलें. माधवरावांनीं हैदरावर मिळविलेल्या जयाच्या मानानें या तहाच्या अटी फारच क्षुल्लक होत्या हें खरें आहे आणि खुद्द माधवरावांस त्या पसंतही पडल्या नाहींत. पण एकदां राघोबाकडे काम सोंपविलें त्यांत बोलण्याचा आपणास अधिकार नाहीं, असें समजून तो पेशवा स्वस्थ बसला. अशा प्रकारें हैदरावरील

पहिल्या मोहिमेची परिसमाप्ति झाली आणि **माधवराव** पुण्यास परतले.

**८ नागपूरकर भोंसल्यांशीं कटकटी**:—कर्नाटकांत पूरी-फत्ते मिळवून चांगली जरब बसविल्यानंतर **माधवराव** पेशवे पुण्यास आले. तेथें येतांच त्यांनीं आपल्या चुलत्यास ह्मटलें, काका ! **पानिपत**च्या पराजयापासून उत्तर हिंदुस्थानांत आपला दर्प फिका पडत चालला. तेथली सर्व घडी बिघडली. ती पूर्व-वत् बसविण्याकरितां आपण तिकडे सैन्य व मर्द सरदार पाठ-विले होते पण गृहकलहामुळें तें काम तसेंच अर्धें पडलें. आतां तिकडे मोहीम करून आपला वचक यथापूर्वक बसविला पा-हिजे. तिकडील माहिती तुह्मांस व **विठ्ठल शिवदेव, होळ-कर शिंदे** यांस आहे तशी इतरांस नाहीं. इकडे दक्षिणेंत आ-णखी कारस्थानें निघतील, शिवाय त्याकरितां इकडल्या बंदोब-स्तासाठीं मी येथें राहतों. आपण हिंदुस्थानांत जाऊन मोहीम करावी. हें लष्करही येथें आतां स्वस्थ बसलें आहे. त्यांनाही कांहीं कामगिरी सांगितलीच पाहिजे. हा माझा सल्ला आपल्या मनास कसा काय येतो ? त्यावर **राघोबा**नें सांगितलें, फार उत्तम गोष्ट आहे. **माधवा,** तूं कांहीं काळजी करूं नको, मी हिंदु-स्थानांत जातों.

तों इतक्यांत नागपूरकरांचा आणि पेशव्यांचा बेबनाव झाला. होतां होतां बेबनावाचा द्वेष माजून एकमेकांची समरांगणीं गांठ पडावी येथवर मजल येऊन ठेपली. इतक्यांत **जानोजी भों-सला** पेशव्यांच्या मुलुखांत लुटालूटही करूं लागला. तेव्हां **माधवरावांनीं** आपल्या चुलत्यास ह्मटलें, ही फौज घेऊन मी तूर्त **भोंसले** नागपूरकरांवर जातों. तिकडून आलों ह्मणजे मग आपण तेंच सैन्य घेऊन हिंदुस्थानांत जावें. **पटवर्धन, विंचुर-**

कर, पेशवे हुजूर आणि हैदराबादचा दिवाण रुकनुदौला इतक्यांचीं सैन्यें भोंसले जानोजीवर तुटून पडलीं. नागपूरकरांचें पारिपत्य करावें व आपणांस ऐन वेळीं दगा दिल्याचा सूड घ्यावा असें निजामाच्या मनांत फार फार होतें आणि आतां खुद्द पेशवे त्याच्यावर चाल करून निघाले आहेत तर त्यांस आपणही जाऊन मिळावें ह्मणून नबाबाचा दिवाण बरीच फौज घेऊन पेशव्यांस येऊन मिळाला होता. अशा प्रकारें सैन्य आपणांवर येत आहे असें ऐकून जानोजीची गाळण झाली, ह्मणून तो समोर उभा ठाकेना. ह्मणण्यासारखा लढाईचा प्रसंग कोठेंच येईना. जानोजीनें पळताच पाय घेतला, तेव्हां माधवराव एकाच मुक्कामीं छावणी करून बसले आणि पाठलाग करण्याचें काम त्यांनीं पटवर्धनमंडळीवर सोंपविलें. पटवर्धन, जानोजीचे किल्ल्यामागून किल्ले घेत पळत चाललेल्या सैन्याचा पाठलाग करीत सुटले. आतां आपली कांहीं घडगत दिसत नाहीं. पटवर्धन आपल्या सुटलेल्या सैन्याचा सुद्धां सप्पा उडवीत चालले आहेत तेव्हां न जाणों आपल्याही जीवावर बेतावयाचें. असें समजून जानोजी प्राणसंरक्षणार्थ एकटाच घोड्यावरून पळत सुटला. व गोपाळराव पटवर्धनही सडाच त्याच्या पाठीस लागला. अशा प्रकारें झटपट चालली आहे तों इतक्यांत जानोजीनें माधवरावांस सांगून पाठविलें कीं मी तुह्मांस शरण आलों, मला प्राणदान द्या. तुह्मी सांगाल त्याप्रमाणे

इ.स.१७६९

तह करण्यास मी राजी [1]आहें. हा निरोप येतांच खालील कलमांचीं तहाची याद माधवरावांनीं जानोजीकडे पाठविली व ती त्यानें अगदीं निमूटपणें मान्य केली.

---

१ गंगा उत्तरसंनिध महेश्वर मुक्काम मौजे कनकापुर येथें हा तह झाला ह्मणून त्यास कनकापूरचा तह ह्मणतात.

१ पूर्वी आठ लक्षांचा मुलूख भोंसल्यांकडे होता तो पेशव्यांनीं परत घ्यावा.

२ अक्कलकोटकर फत्तेसिंग भोंसल्याचे जप्तीचा कांहीं वसूल येईल तोही पेशव्यांनीं घ्यावा.

३ पेशव्यांचे दरबारांतून कोणी रुसून येईल तर त्याला भोंसल्यानें आश्रय देऊं नये.

४ इंग्रज, रोहिले, दिल्लीबादशहा, अयोध्येचा नबाब किंवा दक्षिणीसुभेदार यांतून कोणाशींच राज्यकारणी मसलत भोंसल्यानें करूं नये.

५ प्रत्येक पांचवे वर्षी भोंसल्यानें ५ लाख रुपये पेशव्यांस देत जावें.

या तहाच्या अटींवरून नागपूरकर किती मऊ झाले हें व्यक्त होतें. त्याचप्रमाणें "सबसिडरीसिस्टिम" ह्मणून जी एक तहाची सुरेख पद्धत सुरू करून कंपनी सरकारानें आपले हातपाय पसरले व ज्या पद्धतीची तारीफ इतकी आज लोक करीत आहेत त्या तऱ्हेचा अवलंब नव्हे तर बीजारोपण माधवरावांनीं केलें असें तीन व चार कलमांवरून दिसतें. ह्मणजे माधवरावांच्या राज्यकार्यधुरंधरतेचें हें मोठें विलक्षण व थक्क करणारें कौशल्य होय ! इंग्रजांच्या पूर्वी माधवरावानें

---

१. मूळ तहाचा उतारा "काव्येतिहाससंग्रहांतर्गत भोंसल्याच्या कागदपत्रांतून" उतरून घेतला आहे. तो येणेंप्रमाणें:—

राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यांस, सकळगुणालंकरण अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री स्नेहांकित माधवराव बल्लाळ पंतप्रधान—आशीर्वाद विनंती उपरी, येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ ल्याहावें विशेष, आपण कितीएक प्रकारें तिर्थरूप कैलासवासी यांचे वेळेस निखालस वर्तलेत. त्या अलीकडे

ही शकल शोधून काढिली व त्याचेंच अनुकरण इंग्रजांनीं केलें असें ह्मणावयास हरकत नाहीं! अशा प्रकारें पेशवे व नागपूरकर यांच्यांत स्नेहसंबंध जडला. **माधवराव** व **जानोजी** यांच्यांत एक पत्रव्यवहार या तहानंतर झाला, त्यांत आणाशपथा परस्परांनीं वाहून इतउत्तर वैरभाव ठेवावयाचा नाहीं असा निश्चय केला. यावरून **माधवरावांच्या** मनांत एकोपा वाढविण्याविषयीं केवढी उत्सुकता असे आणि झाल्या गोष्टी विसरून ताज्या दिलानें वागण्याची त्याला किती हौस आणि तसें वागण्यास आवश्यक असा मनाचा मोठेपणा कसा होता हें चांगलें व्यक्त होतें. **बाजीराव बल्लाळ, माधवरावांचा** आजा, त्यानें **दाभाड्यांशीं** ह्मणजे आपल्याच धन्याच्या दुसऱ्या नोकरांशीं युद्ध मांडलें, तसाच वखत त्याचा नातू **माधवराव** याला प्राप्त झाला. परंतु **माधवरावांच्या** वर्तनांत आणि **बाजीरावाच्या** वर्तनांत जमीनअस्मानाचें अंतर दिसून येतें. **दाभाडे** निजामास सामील होणार होते आणि नागपूरकर सामील झाले होते. दाभाडे समरांगणांत दंड ठोकून उभारण्याच्या पूर्वीं **बाजीराव**

---

कालगतीनें दरम्यान न व्हावयाच्या गोष्टी झाल्या. त्यास सांप्रत सर्वप्रकारें निखालस वर्तावें व या दवलतीचें कल्याण इच्छावें. या अर्थावरून संतोष जाहला. त्यास तुह्मी तरी सर्वप्रकारें या दवलतीचें उत्तम तेंच इच्छावें, काडीमात्र दुसरा भाव नसावा, व येथून तिळतुल्य आपणाविषयीं दुसरा विचार नाहीं. सर्वप्रकारें निखालसतीनें असावें यांशीं अंतर होणार नाहीं. याजविषयीं आपणही शपथपूर्वक पत्र पाठविलें त्याप्रमाणें चालावें. येथूनही ऐसेंच वर्तण्यांत येईल—त्यांस तीर्थरूप कैलासवासी नानासाहेबांची शपथ असे व श्रीगजाननाची शपत असे—जैसे निष्ठेनें वर्ताल तैसेंच तुमचे दवलतीची अभिवृद्धि करण्यांत येईल. वरकड मजकूर हे सांगतील त्यांजवळून कळेल. छ २७ माहे सव्वाल. वहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती. लेखनसीमा.

त्यांच्या अंगावर तुटून पडला. आणि नागपूरकरांनीं लुटालूट आरंभिल्यावर **माधवराव** त्याच्यावर चालून गेले. **बाजीराव** यानें **दाभाड्याच्या** सैन्यांत फितूर करवून, खासा, बायकांच्या काव्यानें ठार करविला. **माधवरावांनीं** खाशाला शहांत धरण्यास फर्माविलें. असें सर्वप्रकारें उभयतांच्या वर्तनांतील महदंतर तेव्हांच कोणाच्याही ध्यानांत येण्यासारखें आहे !

अशा प्रकारें नागपूरकरांशीं सलोखा झाल्याचें वर्तमान **माधवरावांनीं राघोबास** कळविलें तेव्हां **राघोबा** पुण्याहून निघाला. त्याची आणि **माधवरावांची** वाटेंत भेट झाली. नंतर **माधवरावांचें** सैन्य घेऊन तेथूनच परभारें हिंदुस्थानच्या मोहिमेवर काकासाहेबांची स्वारी पूर्वसंकेतानुरूप निघाली.

**९ हिंदुस्थानाकडील वर्तमानें:—पानपतच्या** भयंकर युद्धाचा सपाटून सूड घ्यावा ही **माधवरावांस** सारखी रात्रंदिवस तळमळ लागलेली असे आणि ईश्वरानें या प्रौढप्रतापनिधि पेशव्यास थोडें जास्त आयुष्य दिलें असतें तर सव्याज वाढीदिढीनें सूड घेतल्याशिवाय तो कदापि राहतांना. पण तसें कर्तव्य ईश्वराला आवडलें नाहीं, ह्मणून त्या ईश्वरानें **माधवरावांला** पुरीं बारा वर्षें सुद्धां पेशवाई उपभोगूं दिली नाहीं. तें असो, त्याचा उपयोग कांहींएक नाहीं. झाल्या गोष्टी होऊन चुकल्या. त्याबद्दल कितीही हळहळ केली ह्मणून त्या परत येणार आहेत थोड्याच !

हिंदुस्थानांत मोहीम करण्यासाठीं **राघोबा**, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, **होळकर मल्हारराव** आणि **शिंदे महादजी** यांस **माधवरावांनीं** पाठविलें खरें, पण तेथें सर्व विपरीतच घडूं लागलें. **मल्हारराव** कैलासवासी झाले. **शिंद्याचें** व **राघोबाचें** पटेना. **विंचूरकरांस** अंतकाळचें दुखणें लागलें. नाहीं ह्मणाव-

यास गोहदच्या राण्याला मात्र या मंडळीनें जेरीस आणून, त्यानें पेशव्यांचा मुलूख बळकाविला होता तो सोडविला, व तीन लाखांची दरसाल खंडणी त्याच्याकडून ठरवून घेतली ! तिकडे कोणकोणतीं कारस्थानें कशीं कशीं निघालीं हें विस्तृतपणें कळविणें जरूर आहे, तेव्हां थोडें जास्त लिहलें पाहिजे.

**सरदारांची हकीकतः—शिंदे, होळकर, गाईकवाड, पटवर्धन, विंचूरकर, पवार** इत्यादि सरदार पेशव्यांच्या पदरीं असत. त्यांनीं केलेल्या व त्यांच्याकडे घडलेल्या हकीकतीचा संबंध पेशव्यांकडे असणें साहजिक आहे. कारण ते करीत तें पेशवे यांच्या वतीनें, अर्थात **सातार**करांच्या तर्फे असे. ह्मणजे त्याचा उल्लेख पेशव्यांच्या कारकीर्दींत आलाच पाहिजे. यास्तव तो भाग गाळतां येत नाहीं. आणखी **पानपत**च्या गर्दींत यांपैकीं बहुतेकांची बरीच वाताहत झालेली होती. **माधवराव** मसनदीवर आले ती वेळच अशी कांहीं चमत्कारिक होती कीं, एकीकडे मोठमोठ्या पदरच्या लोकांवर कहर कोसळला आहे, त्यांत कोणी कर्ता माणूस उरला नाहीं, जीवाला जीव देऊन समरांत शत्रूंशीं भिडण्यासाठीं जोडलेल्यांच्या घराण्यांत हाहाकार कोसळून ज्याचें त्यालाच आवरेनासें झालें आहे, ऐन वेळीं आपणांस उपयोगीं पडणाऱ्यांच्या पोरांबाळांचीच थावराथावर करितां करितां नाकीं नव येण्याचा प्रसंग आणि दुसरीकडे काका प्रत्यक्ष चुलते—तीर्थरूपांचे बंधु, मोठे मर्द, प्रौढ अनुभवी, चांगले कर्ते, महारणधुरंधर, हजारों मोहिमा करून मुरलेले असे वडीलच तंटा करण्यास उद्युक्त झाले—कदीम दुस्मनांस बगलेंत मारून बखेडा करूं लागले, घरांतल्या घरांत फूट माजवून सारा गप्पागोंधळच करीत बसले. अशा प्रकारें चोंहोंकडून कहर उठून आकाश फाटत चाललें असतां पुरी विशीही भरली नाहीं. इतक्या व-

याचा मूल पेशव्यांच्या मसनदीवर आला. तो आलेला **माधवराव** होता ह्मणूनच निभावला, इतरांची प्राज्ञा नव्हती.

शिंद्याचा औरस वंश **पानिपतांत** जळून खाक झाला! लेंकवळी मंडळी गादीचा वारसा सांगूं लागली! **महादजी** विदुरवंशापैकीं, तो **पानपत**च्या गर्दीत होता व त्या प्रसंगीं त्याला लंगडशाई प्राप्त झाली. त्याला, सहाय्य होऊन **हिंदुस्थान**ची मोहीम पार पाडावी असें **माधवरावांनीं** फर्माविलें. पण पुढें लौकरच **राघोबा**चा व त्याचा बेबनाव झाला. औरसवंश नष्ट झाला. तेव्हां पुढें आतां कोणाकडे तो वंश चालवावा, याची वाटाघाट **पुण्यास** चालली. तेथें तर एका म्यानांत दोन समशेरी–**राघोबा** आणि **माधवराव**:–विदुरवंशाकडे एवढी दौलत चालवावयाची नाहीं हा निर्धार **राघोबा**चा; आणि त्याप्रमाणें **मानाजी फांकडे** नामक एका गृहस्थाच्या ओटींत शिंद्याची दौलत **राघोबा**नें घातली. **माधवरावांच्या** मनांत **महादजी**सच त्या दौलतीचा धनी करावयाचें होतें आणि त्याप्रमाणें **माधवरावांनीं** आपल्या हातीं सत्ता येतांच **महादजी**स शिंदेघराण्याचा कुलवारस केला.

हा **महादजी** भारी कर्तृत्ववान् व मोठा रणपंडित असे. शिंदे याचें व **राघोबा**चें वैमनस्य येण्याचें कारण **होळकरां**चे कैफियतींत येणेंप्रमाणें आहे:–**दादासाहेबां**ची एक टोळी धान्यादि सामुग्री मिळविणारी–तिला कही ह्मणतात–**गोहद**च्या राण्यानें लुटली. तें वर्तमान कळतांच दादासाहेबांची मर्जी भारी खप्पा झाली. त्यांत **गोहद**वाल्यानें **पेशव्यांचा** कांहीं मुलूख बळकाविला होता तेव्हां दादासाहेबांचा निर्धार ठरला कीं “**गोहद** खोदून मोकळी करावी.” **गोहद**चा राणा कडवा जाट. मोठा लढवय्या. चांगला फौजबंद आणि पूर्वापार स्नेहानें वागणारा. तेव्हां त्याच्या..र असें एकदम निकरानें कोस-

ळणें बरें नव्हे, ही सल्ला शिंदेहोळकरांची. पण ती राघोबाला कोठून रुचावयाला ? त्याच्या मनानें घेतलें कीं बस्स! गोहद्च्या राण्याला तळाशीं दडपावयाचें. मल्हाररावांचा इरादा त्याच्याशीं सलोखा ठेवून आधीं आपला कार्यभाग साधावा. पण तें कांहीं राघोबाच्या मनास येईना. अगोदर गोहद्वाला बुडवून मग काय तें दुसरें काम. त्याप्रमाणें राघोबा गोहदेस मोर्चा लावून बसला. आठ महिने झाले. दाद लागेना. इतक्यांत शिंद्याचें व गोहद्च्या राण्याचें सख्य आहे व आंतून त्याला शिंदे दारूगोळ्याची सुद्धां कुमक करितात असें वर्तमान राघोबाच्या कानीं आलें. मग काय विचारावयाचें आहे ? राघोबाची मर्जी अतिबेताल झाली ! महादजीच्या हातीं दौलत देऊं नये असा त्याचा पहिल्यापासूनच आग्रह, तो न जुमानतां माधवरावांनीं त्याला धनी केलेला. तेव्हां त्या सर्वांचा सूड घेण्याचा राघोबाच्या मनानें निर्धार केला. महादजीस "मेखसू घालून मारून टाकावा" असें राघोबा उघड आणि चारचौघांत बोलले. हें कर्णोपकर्णी मल्हाररावास कळलें. तेव्हां तो म्हातारा चटकन् उठून लगेच राघोबाकडे जाऊन ह्मणाला, शिंद्याविषयीं भलतेंच मनांत आणूं नये. त्यावर राघोबानें उत्तर केलें "सुभेदार आपण या कारभारांत पडूं नये. अखेर गुलामाची जात आपले जातीवर गेली;" तसल्या उत्तरानें मल्हाररावाची तृप्ति होणार आहे थोडीच. त्यानें पुनः राघोबास ह्मटलें "शिंदे उभे केले त्या दिवसापासून आजपावेतों कंपेश (अजमासें) कोट रुपये होऊन त्यांत चार कामें सुधारलीं असतील, दहा कामें बिघडलीं असतील. तीन पुरुष सरकारकामास आले, तेव्हां दौलतींतील माणूस गणनीय. मरातब्यास आले ते नादान गोष्टीवर माणसाचा आब घ्यावा ही गोष्ट कोठील ?

माणूस करण्यास लाखों रुपये त्याच हेतूनें बिघडावे लागतात तेव्हां माणुसकी येती. पोरपण करूं नको. दौलतीचीं कामें आहेत." असा पुष्कळ उपदेश केला तरी कांहीं उपयोग होईना. **माधवरावांला** हें वर्तमान कळलें, तेव्हां त्यांनीं होळकर व **विठ्ठल शिवदेव** यांस चिठी स्वदस्तुरची लिहिली कीं, "आजपर्यंत आपले कार्याकरितां शिंदे यांचे कुळाचे सर्व पुरुष रणांत बळी पडले. फक्त **महादजी** एवढाच आतां उरला आहे. तोही स्वामिभक्त आहे. यास्तव त्याचा बचाव होईल असें हरतऱ्हेनें करावें;" त्याप्रमाणें कांहीं युक्ति योजून होळकरानें **राघोबांची** समजूत मोठ्या शिताफीनें काढिली. एके दिवशीं **राघोबा** प्रसन्नअंत:करण आहेत असें पाहून **मल्हारराव** व **महादजी** जाऊन **राघोबांच्या** पुढें साष्टांग दंडवत घालून आडवे पडले. तेव्हां **राघोबा** एकदांचे शांत झाले.

**मल्हारराव** होळकर यानें आपल्या बहात्तर वर्षांच्या उमरींत **बाजीराव, नाना**साहेब यांच्या कारकीर्दी अव्वलपासून अखेरीपर्यंत पाहिलेल्या. त्याच्या सारखा कर्ता व बुजरूक माणूस **माधवरावांच्या** कारकीर्दींत दुसरा कोणी नव्हता.[१] **मल्हारराव** वारले तेव्हां **राघोबास** "बाजीराव,

---

१ **मल्हारराव** होळकर जातीनें धनगर असतां भूदेव ब्राह्मण पेशवे त्यांना घरांतील वडिलांसारिखे लेखीत. याबद्दल एक आख्यायिका मागें आलीच आहे. **माधवराव** तर **मल्हाररावांस** काका ह्मणत. आणखी **महादजी**संबंधानें **राघोबा**च्या मनांतील किल्मिष काढण्यासाठीं कांहीं युक्ति योजून **राघोबा**च्या पुढें **मल्हारराव** "हात रुमालनें बांधून पायां पडले." तेव्हां "दादासाहेबांनीं सुभेदारांस आपले हातें जबरदस्तीनें उठवून बहुत ग्लानि **लेंकुरपणा**चे अन्वयें केली कीं "आह्मां त्रिवर्गास आपण रायाचे ठिकाणीं, त्यांत आपण मजला

नाना, भाऊ गेले त्या समयीं इतकें दुःख वाटलें नाहीं. सुभेदार मृत्यु पावल्यानें बहुतच श्रम वाटले. आतां वडील ह्मणून विश्रांतीस कांहीं राहिला नाहीं;" असा प्रकार असल्यामुळें माधवराव मसनदीवर आले त्यावेळीं सर्व राष्ट्ररूपी आकाश नानाप्रकारच्या संकटढगांनीं व्याप्त झाल्यामुळें काळाकुट्ट अंधार आधींच पडला होता आणि त्यांत केल्यासंवरल्या व मुरब्बी सुभेदाराच्या मृत्यूचा झंजावात सुटला त्यामुळें तर दशदिशा

---

लेंकुरासारखें मोजून या मरातब्यास आणिलें. तेव्हां हें कृत्य करणें आमचें अकल्याणाचें सूचक आहे." इतक्या प्रकारची अदब राघोबा धनी आपल्या चाकरांची ठेवीत होता. याजवरून किंचित विचारशील मनाच्या माणसांस अनेक गोष्टी आपोआप कळून येण्यासारख्या आहेत. तेव्हां त्याचा उल्लेख करण्याची गरज कांहीं नाहीं! आपल्या धन्याशीं बेइमानगिरी केल्याचा आरोप पेशव्यांवर कित्येक आणितात पण तो कसा खरा हें कांहीं कळत नाहीं. शाहूमहाराजांनीं आपण होऊन राज्य पूर्णपणें पेशव्यांकडे सोंपविल्याची सनद दिली आणि पुढें जी मंडळी छत्रपति झाली त्यांचे अंगांत बखेडा करण्याचीच अक्कल जास्त असे, पेशव्यांनीं आपण ह्मणजे छत्रपतीचे नौकर नव्हे असें कधींच लेखी व तोंडी कोठेंही ह्मटलें नाहीं, एवढेंच नव्हे तर छत्रपतीच्या नांवेंच त्यांनीं सर्व कारभार चालविला, वस्त्रें घ्यावयाचीं तीं छत्रपतीकडून राजरोस भरसभेंत घेऊन आपण त्यांचे नौकर असें आपण होऊन दाखविण्याचा प्रसंग आणल्याशिवाय पेशवे कदापि राहिले नाहींत. आणि दरबारांतही सेव्यसेवकभावाचें त्यांनीं उल्लंघन केलेलें नाहीं. सवाईमाधवराव तर आपल्या विवाहसमयीच्या समारंभांत छत्रपतींवर अनवाण्या पायांनीं उभे राहून चवऱ्या ढाळीत होते, इतक्या गोष्टी खऱ्या, तर धन्याशीं बेइमानगिरी त्यांनीं कशी केली हें कांहीं कळत नाहीं! याबद्दल जास्त चर्चा करण्याचा प्रसंग अनायासें निराळा येणार आहे, तेव्हां येथें एवढाच उल्लेख पुरे.

अगदीं धुंद झाल्या ह्मणावयास हरकत नाहीं. सूर्यनारायणावर ढगांनीं आपलें आच्छादन कितीही प्रातःकालीं दाट केलें असलें तरी भर दोनप्रहरींच्या उग्र स्वरूपापुढें त्या ढगांचें कांहींएक चालेनासें होतें. तसाच प्रकार या **माधव**दिनमणीचाही होय! **माधवराव** प्रतापमार्तंड. त्याच्यापुढें हीचर्शी काय, याजपेक्षांही बलवत्तर संकटें एक नव्हे, सहस्र आलीं ह्मणून त्याचा काय उपयोग होणार? चंदन घांसल्याशिवाय सुवास मिळत नाहीं. त्याप्रमाणेंच कर्तृत्ववान् मनुष्याचें आहे. अंगावर संकटें एकामागून एक कोसळूं लागलीं ह्मणजेच त्याच्या अंगचें तेज जास्त जास्त फांकूं लागतें! काय करूं, संकटें आलीं, गांगरून गेलों मला कोणी सहाय्य नाहीं, देवा! कसारे मजवर वखत आणलास? ह्मणून रडत बसणारा केवळ भागूबाई होय. त्याच्या अंगांत कांहींएक तेजच नसावयाचें! तशी गोष्ट **माधवरावा**ची नव्हती. आलेल्या संकटास पायांखालीं सप्पाटून तुडविण्याची त्याच्या अंगीं हिम्मत असे, ह्मणूनच त्याचें अद्यापही इतकें आह्मांस कौतुक वाटतें!

होळकर **मल्हारराव** कैलासवासी झाले, तेव्हां त्यांना औरस संतति त्यांचा नातू **खंडेरावा**चा पुत्र **मालराव** हा होता. पण तो वेडसर असे. सून देवी **अहिल्याबाई** बिचारी विधवा. तेव्हां आपल्या मागें आपल्या राज्याचें कसें होईल ही त्याला मोठी विवंचना होती. **तुकोजी होळकर** हा आप्तविषय पण चाकरपेश्यानें **मल्हाररावा**जवळ होता. त्याच्या व दादासाहेब आणि **महादजी** शिंदे याच्या हातीं सुभेदारांनीं त्या आपल्या नातवांस-**मालराव बाबां**स सोंपविलें. पण बिचारे **मालराव** आजाच्या पश्चात् पुरे दहा महिनेही जिवंत राहिले नाहींत. त्यांचा काळ झाला. होळकराच्या घराण्यांत औरस संतति राहिली नाहीं

**देवी अहिल्याबाई** बायको माणूस. पुत्रशोकानें विव्हळ झालेली. सुभेदारांचें दुःख, त्यांत पुत्रशोक, दोन सुना सती गेल्या, स्वतः विधवा. तिला त्या वेळीं सारें ब्रह्मांड आठवलें. आणि इतक्यांत **गंगोबा तात्या चंद्रचूड,** होळकराचे दिवाण, कृतघ्नतेस प्रवृत्त झाले. त्यांनीं **राघोबास** निरोप पाठविला कीं होळकराची दौलत बेवारसा. आपण त्यांना पुत्राच्या ठिकाणीं, तेव्हां येऊन दौलतीची व्यवस्था लावावी! **राघोबाला** या प्रसंगीं राज्यतृष्णा अनावर झालेली. **माधवरावांनीं** चांगलें धाब्यावर बसविलें होतें. तेव्हां होळकरशाई तरी घशाखालीं उतरवावी हा बिचाऱ्याचा विचार. पण लाग कांहीं साधला नाहीं. **देवी अहिल्याबाईनें राघोबाची** डाळ ह्मणून पचूं दिली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याच्या हेतूला अनुरूप अशी—तिनें युद्धाची सुद्धां तयारी ठेविली होती ह्मणतात. **राघोबाच्या** मनांत होळकराच्या घराण्यांत बहुत खेळखंडोबा करावयाचे होते, कारण **गंगोबासारखा** निमकहराम दिवाण त्याचा सूत्रधार झाला होता! पण **माधवराव** मुख्य पेशवा, मोठा सरळ, सीध्या स्वभावाचा आणि परमन्यायी, त्याचप्रमाणें अतिचतुरस्र पुरुष—होळकरघराण्यानें आजवर बजाविलेली नौकरी मनांत आणितां **अहिल्याबाईसारख्या** सच्छील व पुण्यशील स्त्रीच्या धोरणानेंच तिला आपला राज्यकारभार पाहूं द्यावा असें या पेशव्यांचें ह्मणणें, आणि त्याप्रमाणें—त्या **माधवरावां**—नीं **अहिल्याबाईस** कळविलें कीं, कोणास पाठवावयाचें तें इकडे पाठवा, ह्मणजे वस्त्रें देतों. यामुळें **राघोबांचें** कांहीं फारसें चाललें नाहीं. त्यानेंही पानांवर पान टाकिल्यासारखें करून आपला बोज नाहक दवडिला नाहीं!

---

१ आमच्यांतील एक अमोलिक स्त्रीरत्न ह्या नांवानें देवी अहिल्याबाईचें चरित्र प्रसिद्ध झालें आहे. तें अवश्य वाचावें.

मात्र **गंगोबा**ची निमकहरामी चांगली निदर्शनास आल्यामुळें देवी **अहिल्या**बाईनें त्याला निर्माल्यवत् आपल्या दरबारांत करून ठेविलें. एरवीं त्याचा सर्व इतमाम चालला होता. व पूर्वापारपद्धतीप्रमाणें त्याला कांहीं कामकाजही **अहिल्यादेवी** सांगे व वरपंगी त्याची इभ्रत पूर्ववत् ठेविण्यांत तिनें कमी केलें नाहीं; पण हा निमकहरामीस आला इतकें तिनें ओळखून ठेविलें होतें.[1]

---

१ **गंगोबा चंद्रचूड** दिवाण निसबत, यानें **राघोबाला** सल्ला दिला कीं **मल्हाररावाची** दौलत हल्लीं बेवारसा आहे तर आपण त्याची व्यवस्था लावण्यासाठीं यावें. आणि इकडे **अहिल्याबाईस** सांगितलें कीं एक लहानसें मूल आपल्या घराण्यांतील पाहून दत्तक घ्या आणि त्याच्या नांवें राज्यकारभार चालू द्या. **गंगोबा, राघोबास** फितुर झाला आणि दौलतींत ढवळाढवळ करण्यासाठीं **राघोबा** येत आहे हें वर्तमान ऐकतांच **अहिल्याबाईनें** "आपलें शोकाचें गांठोडें एकीकडे बांधून ठेवून" मोठमोठ्या मराठे सरदारांस पत्रें लिहून, माझ्या सासऱ्यानें इतक्या मेहनतीनें कमाविलेल्या दौलतीचा अभिलाष धरून धनी पेशवे सांप्रत येत आहेत, करितां याप्रसंगीं मजला कुमक करावी. आपल्या वडिलांनीं समशेर गाजवून दौलत मिळविली आहे; तेव्हां आपण ती अशीच कांहीं जाऊं देणार नाहीं हा निर्धार **अहिल्या देवीचा.** तों इतक्यांत **राघोबा** सैन्यासुद्धां इंदुरास यावयाला निघाला. **तुकोजीरावांनीं** 'क्षिप्रानदी उतरलांत कीं धनी ह्मणणार नाहीं; आपणांवर शस्त्र चालवूं,' असा निरोप **राघोबास** **अहिल्या**बाईच्या तर्फे पाठविला. तेव्हां **राघोबानें** उलट निरोप पाठविला कीं, सांप्रत **मालराव** कैलासवासी झाले; सबब **अहिल्याबाईच्या** समाचारास, आपला पूर्वापार घरोबा जाणून येत असतां असा निरोप पाठविला याचें कारण काय? त्यावर **तुकोजीरावांनीं** परत जबाब धाडिला कीं आपण आमचे धनी, मालक आहांत. वडीलही आह्मांस आपणच. 'मातंग पोशीस येता उत्तम गोष्ट आहे. पण बरोबर सैन्य कशाला हवें' आमचें सैन्य आहे तें

आणि आपण तसें पूर्वीच ओळखिलें आहे अशा प्रकारानेंच ती त्याला वागवीत असे. देवी अहिल्याबाईच्या मनांत दत्तक न घे-तां आपणस्वतःच राज्यकारभार चालवावा आणि तुकोजी होळकर, मल्हाररावापाशीं आप्तइष्टांपैकीं एक चाकरवेशानें होता त्याच्या हातीं इतर सेनेचीं वगैरे सूत्रें यावींत असें होतें. गंगोबा[1] मुख्य दिवाण मल्हाररावापासून. पण सांप्रत त्यांनीं बेइमान-गिरी केली सबब त्यांच्यावर आपला इतबारच ठेवावयाचा नाहीं असा तिचा निर्धार झाला. राघोबाच्या मनांत कसेंही असलें तरी माधवरावानें आपल्या पदास योग्य असेंच आचरण केलें आणि अहिल्याबाईच्या विनंतीप्रमाणें तुकोजीस वस्त्रें देऊन त्याची पुण्याहून इंदुरीं मोठ्या इतमामानें रवानगी करून दिली.

---

आपलें नव्हे कीं काय? त्यावर राघोबा निरुत्तर होऊन सडा एक-दोघां खिजमतगारांनिशीं इंदुरास चालता झाला! न जाऊन बिचारा करितो काय!

१ गंगोबानें होळकरांशीं बेइमानगिरी केली ती केली, पण माधवराव पेशव्यांचें व त्याचेंही जमत नव्हतें. गंगोबा राघोबाच्या पक्षाचा असे. एकदां भर दरबारांत कांहीं बेजाव भाषण केल्यावरून पेशवे माधवरावांनीं त्याची पाठ तेथल्या तेथें सडकून मऊ केली होती ह्मणतात. पुढें गंगोबा संन्याशी होऊन फिरूं लागला. त्याला धरून कैद करावें असा माधवरावांचा फार दिवसांचा मनसुबा होता. तो कांहीं साधेना. त्याला पकडण्याकरितां माधवरावांनीं पाठविलेल्या दोघां हुजुऱ्यांनीं शेवटीं वेष बदलून गंगोबाजवळ खजिनगाराची नोकरी पत्करिली आणि चांगलासा प्रसंग येतांच त्याला पकडून आपण पेशव्यांचे हुजरे तुला पकडण्यासाठीं आलों होतों. आज कामगिरी बजाविली असें सांगून आपण प्रगट झाले. मरे तोंपर्यंत हे गंगोबा माधवरावांच्या कैदेंतच होते! त्यांच्या मुलाला मात्र माधवरावांनींच महत्पदास चढविलें. यांत माधव-रावांची गुणग्राहकता आणि मनाची थोरवी चांगली व्यक्त होते.

ही माधवरावांच्या सरळस्वभावाची उत्तम साक्ष होय! तुकोजीराव होळकर पुण्यास आले तेव्हां माधवरावांनीं त्यांना विचारलें, प्रस्तुत आमचे काकासाहेब आह्मांशीं वैरभावानें वागतात. घरांत त्यांनीं नानाप्रकारचे तंटे माजवून राज्यांत जिकडे तिकडे बखेडे मांडले आहेत. त्यांतून तुमचे दिवाण गंगोबा त्यांच्या जिव्हाळ्याचे. तर आतां आपला ओढा कोणीकडे? गंगोबांवर अहिल्याबाईनें मेहेरनजर पूर्ववत केली असावी, कारण त्याच्याकडे वरपंगी तरी पुष्कळ कामकाज ती सोंपवीत आहे." तुकोजीनें उत्तर केलें, 'गादीवर जो धनी तो आमचा मार्तंड. आह्मी दुसऱ्याला ओळखीत नसतों. आह्मांला माणसें या गादीनें केलीं आहेत, या गादीच्या आशीर्वादानें आह्मी लहानाचे थोर झालों तर या गादीशीं आमच्या हातून बेइमानगिरी व्हावयाची नाहीं. आमचे धनी आपण आणि आपल्या सेवेंत हा देह खर्चिण्याला आह्मीं तयार आहों! चाकरी सांगून अनुभव पहावा'! हें फार उत्तम आहे. असें सांगून माधवरावांनीं तुकोजींस निरोप दिला. अहिल्याबाईच्या भेटीसाठीं तुकोजीराव चालले तों वाटेंत गंगोबा, राघोबा व तुकोजी यांची खलबतें अनेक चाललीं. तें वर्तमान माधवरावांस कळलें, तेव्हां त्यांना वाटलें कीं तुकोजी येथें बोलून गेले तें सर्व कपटी मिट्ठें भाषण. तरी पण त्याची प्रचीति तर पाहूं. ह्मणून माधवरावांनीं एक गुप्त चिठ्ठी तुकोजीरावांस पाठवून विचारिलें कीं, तुह्मी समक्ष बोललांत काय आणि आपलीं हल्लीं खलबतें काय चाललीं आहेत! त्याला तुकोजींनीं उत्तर लिहिलें, बोललों त्यांत अद्याप बालाग्र अंतर नाहीं. धन्यांनीं सैन्यासह येऊन नाशिकास मुक्काम करावा. आह्मी त्रिवर्ग कुच करूं लागलों ह्मणजे आमच्यावर स्वामींनीं चाल करून यावें. आपण आलांत असें कळतांच राघोबास लुटून घेतों. त्याप्रमाणें तुको-

ज्यांच्या लिहिण्याचा भरंवसा जाणून माधवराव नाशिक मुक्कामीं दाखल झाले. राघोबा, तुकोजी व गंगोबा यांस माधवराव आपल्यानजीक, सैन्यासह आले असें कळतांच पुढें कुच करूं लागले. माधवरावांनीं त्यांचा पाठलाग केला. माधवरावांचें सैन्य जवळ आलें असें कळतांच, तुकोजींनीं राघोबावर उलट खाल्ली. आणि लुटण्याला प्रारंभ करीत त्याला दे माय धरणी ठाय असें केलें. जिवाच्या आशेनें राघोबा घोडपच्या किल्ल्यांत शिरले. अशा प्रकारें कामगिरी बजावून मग तुकोजींनीं माधवरावांस मुजरा केला आणि विचारिलें, साहेबांस किल्ल्यांतून धरून आणावें कीं काय? त्यांला माधवराव बोलले, कांहीं गरज नाहीं; आतां जातात कोठें. उगीच माणसाचा खराबा काय ह्मणून करावा? इतकी भूतदया या पेशव्याला क्षत्रियवृत्तींत होती! पुढें त्या किल्लेदारानें राघोबास माधवरावांच्या स्वाधीन केलें, इत्यादि; ही हकीकत होळकराच्या कैफयतींत आहे.

**१० कर्नाटकांतील दुसरी मोहीम.** अशी हिंदुस्थानाकडे मोहीम चालली. तों इकडे हैदर नाईक पुनः गुरुगुरूं लागला! पेशव्यांनीं आपलें नाक ठेंचलें त्याची लाज त्याला फार दिवस राहिली नाहीं. जरा सांवरतांच पुनः पेशव्यांशीं चार हात करण्याची त्यानें तयारी चालविली! पेशवे काय हातांत रणकंकण बांधून सदा सज्जच! त्यांना आमंत्रण आल्यावर जाण्याला मग कोठून दिक्कत वाटावयाची? खांसा स्वारीही मोठें जय्यत सैन्य घेऊन निघण्याची तयारी करूं लागली. घोरपड्यांस त्याचा मुलूख श्रीमंतांनीं हैदरापासून देवविला होता तो हैदरानें परत घेतला. सावनूरकर नबाबाच्या दोस्तीखातर मागें युद्ध उपस्थित झालें होतें आणि तें संपतांना सावनूरकरांस उपद्रव करावयाचा नाहीं असें तहांत कलमही स्पष्ट घातलेलें. पण हैदर नाईक पुनः सावनूरकरांस

त्रास देऊं लागलाच. पूर्वी केलेल्या तहांत हैदरखान अशा प्रकारें अंतर आणूं लागला हें पाहतांच माधवरावांना वाटलें कीं, याची खोड पुनः एकवार मोडली पाहिजे. पटवर्धन, रास्ते, धुळप, मामा पेठे आणि खांसा स्वारी माधवराव इतकेजण एकदम हैदरच्या मुलुखावर तुटून पडले. स्वतः धनी जातीनें मोहीम फत्ते करावयास आले आहेत तेव्हां आपली करामत दाखवावी अशी हुरूप सरदारमंडळीस येणें अगदीं साहजिक आहे. आणि त्याप्रमाणें मराठे, हैदरअल्लीवर हरएक प्रसंगीं पुरा जयच मिळवीत चालले. ज्या किल्ल्यावर हल्ला करावा तो किल्ला सर झालाच, अशी फत्ते सलामत या वेळीं मराठ्यांची होती. सोळा पहाडी किल्ले, व २५ भुईकोट किल्ले, शिवाय मोठमोठीं चार पांच शहरें माधवरावांनीं सर केलीं! हैदराशीं या वेळीं झुंज सुमारें १॥ दोन वर्षें चाललें पण बिचाऱ्याला एकाही ठिकाणीं यश आलें नाहीं. त्याचा मुलूख सारा उध्वस्त करीत मराठे सुटले, तरी, हैदराला अद्याप आपणास यश येईल अशी आशा होतीच. तों इतक्यांत प्रकृति बिघडली ह्मणून माधवराव पुण्यास निघाले व त्यांनीं हैदरखानाची मोहीम मामा[1] व पटवर्धन यांजकडे सोंपविली. त्यांनीं तर हैदरास पुरें जर्जर करून सोडिलें, तें इतकें कीं, शेवटीं त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तहाचें बोलणें आलें ह्मणून मराठे थोडेसे बेसावध आहेत असें पाहतांच पुनः हैदरअल्लीनें मराठ्यांशीं एक सामना दिला. पण त्यांतही बिचाऱ्याला

---

१ हे मामा सदाशिवरावभाऊंचे. यांचें नांव त्रिंबकराव. यांच्या सारखा मोठा शूर आणि निःसीम स्वामिभक्त पुरुष पेशवाईत विरळा; धन्याच्या कल्याणाखातर आणि आपण स्वीकारलेला पक्ष, अखेरपर्यंत संभाळण्यासाठीं या थोर पुरुषानें जे हाल सोसले ते ऐकिले ह्मणजे अंगावर थरारून शहारे उभे राहतात. जवानमर्द ब्राह्मणभाई पेठे मामा, हें पुस्तक वाचावें ह्मणजे सर्व कळून येईल.

यश आलें नाहीं. दगेखोरपणाचें पुरें प्रायश्चित्त देऊन **हैदर** अजी ठार बुडवावा हा निर्धार मग **मामाचा** झाला. आणि मोठ्या निकरानें त्यांनीं **हैदरखाना**वर हल्ला चालविला, तो कांहीं **हैदरा**-च्यानें सहन होईना. मला जीवदान द्या, तुह्मांला दांतीं तृण धरून शरण येतों, असे निरोपांवर निरोप **हैदरखान, मामास** पाठवी. **मामा** ह्मणत, आतां तुमच्या बोलण्याचा आह्मांस इतबार नाहीं. ईश्वर बुद्धि देईल तसें करूं. पुढें आतां काय करावें अशा पंचाइतींत **हैदर** पडला आणि आतां एक चार सहा महिने नेट धरिला ह्मणजे **हैदर** साफ बुडाला हा **मामांच्या**

---

१ स्वामिद्रोहाची ही ओळख **माधवराव** पेशव्यांस हैदरच्या वकीलानें दिली होती, ती आख्याइका "**धनुर्धारीनें**" विविधज्ञान-विस्तार पु. २१ मध्यें प्रसिद्ध केली. ह्या वेळीं हैदराकडील वकील अप्पा-जीराम नांवाचा ब्राह्मण तहाचें बोलणें करावयास आला होता. त्या सं-बंधाच्या दोन आख्याइका बऱ्याच गमतीदार आहेत त्या खालीं देतों. आपणांकडून तहाचें बोलणें करावयास येणाऱ्या मनुष्याला पूर्ण अख-त्यार देऊन पाठवावें असा **श्रीमंत माधवरावाचा** हैदरास निरोप होता. त्याप्रमाणें अप्पाजीरामाची हैदरानें माधवरावांकडे रवानगी केली. माधवराव दरबारांत होते तेव्हां हा वकील आला. त्याचा नम-स्कार घेऊन वसा वगैरे माधवरावांनी ह्मटलें आणि लगेच दुसऱ्या-बरोबर बोलण्याचा बहाणा करून तुमचें बोलणें काय तें पटवर्ध-नांशीं चालूं द्या ह्मणून अप्पाजीरामास माधवराव बोलिले, हा त्याला थोडासा अपमान वाटला. पण त्या वेळचा प्रसंग जाणून निमूटपणें तो सहन करणें अप्पाजीरामाला भाग पडलें. पटवर्धनाशीं बोलतां बोलतां मागें बेदनूरच्या तहांत सर्व गोष्टी ठरल्या आहेत असें अ-प्पाजीरामानें कळविलें. पटवर्धनांनीं सांगितलें होय, तो तह बेद-नूरच्या राजाबरोबर झाला होता. त्याचें राज्य तर हैदरानें बळका-विलें मग त्या तहाचें आतां काय? हा जबाब बिनतोड असें स-र्वांस वाटलें. पण त्याजवरही एक शक्कल अप्पाजीरामानें लढविली

मनांतला विचार. तों इतक्यांत **माधवरावांचीं** पत्रांमागून पत्रें येऊं लागलीं कीं, आमची प्रकृति अत्यंत अत्यवस्थ झाली आहे. घटकेचा विश्वास नाहीं. तुह्मां सर्वांची एकवार भेट घ्यावी असा इरादा आहे. **हैदर** नाइकाचा मोकाबिला तसाच ठेवून इकडे येणें. तेव्हां मात्र **मामांचा** इलाज कांहींएक चालेना व पानावर पान टाकून खालीलप्रमाणें **हैदर** नाइकाशीं त्यांनीं तह केला.

१ शिवाजीच्या वेळीं कर्नाटकचा जितका मुलूख मराठ्यांकडे होता तितका सगळा **हैदराकडून** मिळावा.

२ लढाईचे खर्चाबद्दल ३६ लाख रुपये रोख पेशव्यांस द्यावे.

३ दरसाल १४ लाख खंडणी पेशव्यांस द्यावी.

४ गरमकोंडा व मदगेरी हे किल्ले पेशव्यांकडे असावे.

५ सावनूरचे नबाबांस बिलकुल इजा देऊं नये.

या तहाच्या कलमांवरून **हैदर** किती मऊ झाला तें आपोआपच दिसून येतें. याप्रमाणें **हैदरावरील** या मोहिमीचा शेवट झाला.

**११ अंतकाळ:—हैदरअल्लीवरील मोहीम अर्धीच** टाकून **माधवराव** पेशवे पुण्याकडे परतले. त्यांना

इ.स. १७७२

राजयक्ष्मा नांवाचा क्षयरोग जडला. यंदां बरसात संपतांच खासा स्वारी पुनः मोहिमेवर येणार. **हैदरास** सावध करावें असें **माधवरावजींनीं मामांस** पत्र लिहिलें. कर्नाटकच्या रोंखें

---

तो हात जोडून पटवर्धनांस ह्मणाला "माझे खाविंद आपल्या सरकारचे अंकित दोस्त आहेत. बेदनूरच्या राजाला माझ्या खाविंदांनीं कैद करून त्याची सत्ता बळकाविली ही गोष्ट खरी आहे. पण ती आह्मींच नव्यानें सुरू केली नाहीं. आमच्या खाविंदांचे सरकार पेशवे; त्याचेंच पाहून माझ्या खाविंदानें असें केलें." याचा रोंख सातारकरांकडे होता हें वाचकांस सांगणें नकोच!

विजयादशमीस डेरे ठोकावयाचा मानस **माधवरावांचा**, पण जगद्भक्षक काळानें आपला डेरा **माधवरावां** शेजारीं ठोकला होता! पुण्यास आल्यानंतर श्रीमंतांची प्रकृति दिवसेंदिवस जास्तच बिघडत चालली! आपण ह्मणजे आतां यांतून वांचूं असा भरंवसा **माधवरावांस** कांहीं येईना. हें आलेलें दुखणें आपणांस घेऊन गेल्याशिवाय जाण्याचें लक्षण खास दिसत नाहीं, हें **माधवरावांस** पक्कें कळून चुकलें. तेव्हां पुढल्या निरवानिरवीस तो पेशवा लागला. **माधवराव** पूर्ण निस्सीम गणपतिभक्त. त्यांचें आराध्यदैवत गणपति, तेव्हां आपला काळ गणपतिसन्निध होईल तर तेवढेंच पुण्य आपल्या पदरीं सांचेल आणि अंतकाळ गणपतिदर्शनांत येईल तर मुक्ति मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. ही समजूत त्यांची होती, ह्मणून **माधवराव** पुण्याहून थेऊरास गेले. थेऊर येथें एक जागृत गणपतिस्थान आहे तेथें आपल्या अंतकाळचे दिवस काढावे, असें **माधवरावांनीं** ठरविलें. तेथें गेल्यावर त्यांनीं आपल्या चुलत्यास व मुख्य मुख्य कारभारीमंडळीस आपल्या सन्निद्ध बोलाविलें. **त्रिंबकराव मामा** पेठे आणि **पटवर्धनमंडळ हैदरास** ठार बुडविण्याकरितां मोठ्या हिय्यानें कर्नाटकांत लढत होतें. त्यांना तें काम तसेंच ठेवून तावडतोब आपल्याकडे निघून येण्याविषयीं मोठ्या निकडीचीं पत्रें **माधवरावांनीं** लिहिलीं आणि त्याप्रमाणें तेही येऊन दाखल झाले. आपण आतां खचित मरणार, या दुखण्यांतून कांहीं वांचत नाहीं हें **माधवरावांस** पक्कें कळून चुकलें होतें. तो जात्याच धूर्त व मोठा शहाणा पेशवा. आपल्यामागें कांहींएक बखेडा माजूं नये, व वडिलांनीं कमाविलेलें राज्य अंदाधुंदीच्या भवचक्रांत सांपडूं नये ह्मणून विचारा फार तळमळे. अलीकडे अलीकडे आपल्या कुळावर ईश्वरी कोप झाला!

असावा, नानासाहेब वारले, विश्वासराव, सदाशिवराव-भाऊ पानपतांत कत्तल झाले असे अनेक अनर्थ कोसळले. तेव्हां हा कांहीं तरी दैविक क्षोभ असावा आणि आपणही अल्पायुषी असे जाऊं लागलों यास्तव तो क्षोभ कशामुळें व कां झाला आणि त्याचें सांत्वन कशानें होईल याचा विचार करण्यासाठीं माधवरावांनीं काशीच्या पंडितांस विनंति केली. त्या ब्राह्मणांनीं स्पष्ट जबाब पाठविला कीं स्वामिद्रोह तुमच्या हातून घडूं लागला त्याचा हा सारा परिणाम होय! माधवरावांला हें कारण खरें वाटलें आणि स्पष्टपणें सांगणाऱ्या ब्राह्मणांचा त्यांला किंचितही राग आला नाहीं. स्पष्ट भाषण माधवरावांला फार आवडे आणि स्पष्ट बोलणाराचे ते चाहतेही चांगले असत. काशीकर ब्राह्मणांनीं सांगितलें तें कारण खरें वाटून माधवरावांनीं तत्काल सातारकर माहाराजांस पूर्वी होता त्याजपेक्षां जास्त मुलूख तोडून दिला व त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यासही माधवराव मागेंपुढें न पाहते; पण त्या वेळीं गादीवर असलेले छत्रपति कर्तृत्वशक्तिहीन होते, इतकेंच नव्हे तर, त्यांना मोकळें करण्याचा मूर्खपणा माधवरावांनीं केला असता तर पुढें चाळीस पंचेचाळीस वर्षांनीं नष्ट झालेली हिंदुपदपातशाही एक दोन वर्षांतच नष्ट झाली असती. कारण एवढें राज्य संभाळण्याचें–मिळविण्याचें राहो बाजूला–काम त्या वेळीं फार कठीण होतें आणि तें बजाविण्यास छत्रपति केवळ नालायक अनेक कारणांनीं होते. ह्मणजे सारांश इतकाच कीं आपणांवर स्वामिद्रोहाचा आरोप अंशतः सुद्धां येऊं नये अशी माधवरावांची इच्छा झाली खरी. माधवरावांला आपल्या पश्चात् राज्यकारभार कसा चालेल याची मोठी भीति होती. काकाजी राघोबा, आपलें स्वहित साधण्यासाठीं प्रत्यक्ष पिढीजाद दुस्मनाला देखील घर लुटावयास लावण्याला मागें-

पुढें पहावयाचे नाहींत, हा त्यांला अनुभव आलाच होता. आपल्या पोटीं तर पुत्रसंतान नाहीं तेव्हां पेशवाई दुसऱ्याच्या हातीं सोंपविणें तर भागच होतें. पेशवाईला **माधवरावांच्या** पश्चात् अधिकारी ह्मणजे **राघोबा** आणि **माधवरावांचे** कनिष्ठ बंधु **नारायणराव**. **नारायणराव नानासाहेबांचे** चिरंजीव व **राघोबा** धाकटे बंधु. तेव्हां वडीलपणाच्या नात्यानें **नारायणरावच** राज्याचा अधिकारी ठरावा. हें खरें, पण भाऊबंदकी. अर्ध्या राज्याचा मालक **राघोबा**. शिवाय त्यानें आपली समशेर गाजवून पेशव्यांचा पुण्यप्रताप कांहीं थोडाथोडका गाजविला नव्हता. शिवाय आपल्याला अर्धें राज्य मिळावें ही राघोबाची इच्छाही असे; व तसें त्यानें **माधवरावां**पाशीं मागणें केलें होतें. पण **माधवराव** ह्मणत, पेशवाई ही सातारकरांची नौकरी. दौलत सारी सातारकरांची; त्यांत वांटणी भाऊबंदांची कशी शक्य आहे? आपल्या कारकीर्दीत **राघोबा**ची ही अनावर राज्यतृष्णा कशी तरी आपण कोंडीत आलों, पण पुढें ती कशी आवरणार, ही **माधवरावांस** मोठी काळजी वाटे. ह्मणून त्यांनीं आपल्या चुलत्यास जवळ बोलावून ह्मटलें "काका! आतां तर माझा येथील बहुतेक कारभार आटोपला. मी कांहीं या दुखण्यांतून आतां वांचत नाहीं. आजवर आपण माझा कसा तरी सांभाळ केलात, पुढें आतां काय करावें? माझा जीव घुटमळत आहे. वडिलांच्या पोटीं जन्मास येऊन कांहींएक न करितां मी चाललों, याचें मला फार दुःख वाटतें. पानिपताचा सूड न उगवितां जाणें मला भाग आहे. काका! माझ्यानें फार बोलवत नाहीं. आतां या राज्याचें नांव तुह्मी राखा. वडिलांची कीर्ति वाढविणें तुमच्या हातीं. हा **नारायण** लहान मूल आहे. त्यानें जगांत अजून कांहींएक पाहिलें नाहीं. त्याला अंतर देऊं नका. त्याला

मी तुमच्या हवालीं करितों. सर्व प्रकारें त्याचा सांभाळ करणार आतां तुमच्याखेरीज कोणी नाहीं. त्याला मी अगदीं अंतर देणार नाहीं, असें मला वचन द्या, ह्मणजे माझा जीव घुटमळणार नाहीं. मला **नारायणा**चा मोठा घोर आहे. अशा प्रकारचें आपल्या पुतण्याचें अंतकाळचें भाषण ऐकून **राघोबा** गहिंवरला. तो किती झाला तरी मनाचा मोठा सरळ माणूस. अंतःकरणही त्याचें फार मऊ, त्याला दुःखाचा हुंदका आवरेना. आपल्या **माधवाला**, **नारायणा**ची बिलकुल काळजी वाटूं नये ह्मणून **राघोबानें** पंचायतनांतील बाण उचलून **माधवरावांच्या** हातीं दिला आणि ह्मटलें ' **माधवा** ! मी **नारायणा**ला बिलकुल अंतर देणार नाहीं. तें मूल माझें आहे. तूं कांहींएक काळजी करूं नकोस. ईश्वर तुला या दुखण्यांतून बरा करील. घाबरूं नकोस. मी थेरडा मरतों तर बरें होतें.' **राघोबा**कडून असें वचन मिळतांच **माधरावां**ला थोडा धीर आला. **सखाराम बापू, राघोबांचे** मंत्री. त्यांना **माधवरावांनीं** कैद करून ठेविलें होतें[1]. कारण ते **राघोबांचे** पक्के अनु-

१ **सखाराम भगवंत बोकील** यांसच सखाराम बापू ह्मणत. हे पेशवाईत, साडेतीन शाहणे ह्मणून नांवाजलेले त्यांपैकीं एक शाहाणे. **श्री शिवाजीमहाराजां**वर अफझुलखान आला त्याबरोबर आलेल्या **गोपीनाथपंत बोकीलां**चे हे बापू वंशज. पेशव्यांची दिवाणगिरी या **बापूं**कडे होती. **माधवरावांच्या** कारकीर्दींत **बापूंच्या** वचनापुढें **माधवरावांचें** तेज फिकें पडूं लागलें, तेव्हां **माधवरावांनीं** बापूंसच बोलावून आणिलें आणि प्रश्न केला कीं सांप्रत माझा दरारा आणि वचक असावा तसा नाहीं याला काय करावें? त्यांला या सबंध शाहण्यानें उत्तर दिलें कीं "मला घरीं बसवाल तर आपण ह्मणतां तसें घडेल. माझ्यामुळें आपलें तेज फिकें पडत आहे." आणि हेंच **माधवरावां**ला खरें वाटलें आणि दुसरें कांहीं नाहीं."

यायी व अनेक राज्यकारणें काढून **राघोबास** स्वतंत्र करण्यासाठींही धडपडत असत आणि त्यांची अक्कलही किंचित् जास्तच.

---

त्याप्रमाणें **बापूंस माधवरावां**नीं कारभारांतून काढिलें. व त्यांच्या घरावर पाहरा ठेविला. दररोज रात्रीं **बापूंस** बोलावून आणावें व त्यांचा सल्ला हरएक कामीं विचारावा, हा परिपाठ **माधवरावां**चा असे. **बापूं**ला उलाढाली करण्याची फार संवय, तेव्हां कांहीं कारस्थान काढून त्याबद्दलची चिठी **राघोबा**कडे **बापूंस** पाठवावयाची होती. पण श्रीमंतांचा पाहारा सक्त असल्याकारणानें ती गोष्ट साध्य होईना. पण **बापूच** तो आणि सबंध शाहणा ह्मणून नाणावलेला, त्याला युक्त्या काय कमी सुचावयाच्या आहेत? आपल्या घरच्या मोलकरिणी नदीवर धुवावयास जात; त्यांच्या हातीं ती चिठ्ठी देऊन **राघोबा**च्या कुणबिणी नदीवर येत त्यांच्या हातीं द्यावी अशी योजना **बापूनें** केली. **माधवराव** गुप्त बातम्या काढण्यांत परम दक्ष. त्यांचे हेर नाहींत अशी जागा विरळा. **बापूंची** कुणबीण. **राघोबा**च्या हातीं चिठ्ठी देते तों इतक्यांत **माधवरावां**च्या हेरानें ती चिठ्ठी पकडली. रात्रीं नित्यनियमाप्रमाणें **बापूंस** राजवाड्यांत आणविलें तेव्हां "सरकारचा जो अपराधी त्याला काय शासन" असा **माधवरावां**नीं **बापूंस** प्रश्न केला. **बापूंनीं**, प्रश्नाचा रोंख ओळखून श्रीमंतांचा अपराधी असेल त्याला कैद करावें असें उत्तर दिलें. त्यावर **माधवरावां**नीं **बापूं**च्या स्वदस्तुरीची चिठ्ठी पुढें टाकिली. तेव्हां **बापू** मान खालीं घालून स्वस्थ बसले. पुढें दुसरे एके प्रसंगीं बुद्धिबळें खेळतांखेळतां नागपूरकर भोंसल्यांचा वकील **बापूं**कडे आला होता, त्या वेळीं त्यांनीं, तुमचा राजा चार घरें मागें घ्या अशी मोघम सल्ला दिली. तिचा देखील **माधवरावांस** पत्ता लागून त्याची ओळख त्यांनीं **बापूंस** दिली. **बापू** बिलंदर कारस्थानी, पण त्याची मात्रा **माधवरावां**पुढें कांहीं एक चालेना. आतां आपलें शहाणपण कांहींएक **माधवरावां**पुढें चालत नाहीं ह्मणून **बापू** मग स्वस्थ बसले.

हे, पुढें कांहीं तरी राज्यकारण काढून, **नारायणरावाच्या** तोंडास पानें पुसतील, ही भीति **माधवरावांस** वाटत होती. तेव्हां चोराच्या स्वाधीनच खजिना केला ह्मणजे चोरीची भीति नाहींशी होते. त्याप्रमाणें **नारायणरावास बापूंचे** स्वाधीन करावें हा विचार **माधवरावांचा** होता आणि त्याप्रमाणें **बापूंस माधवराव** ह्मणाले, "आतां पुढें **नारायणरावाचा** प्रतिपाळ आपण चांगला करावा. राज्यकारभार न्यायनीतीनें चालवावा. आतां दुसरा अर्थ मनांत न आणतां काम करावें." श्रीमंतांच्या पायांस हात लावून **बापूंनीं** शपथपुर:सर सांगितलें कीं, आतां मजकडून वांकडी वर्तणूक व्हावयाची नाहीं. पण पुढें प्रकार काय झाला हें

---

**माधवरावांच्या** अंतकाळापर्यंत **बापू** कैदेंतच होते. अंतकाळ आला अशी **माधवरावांची** खात्री झाली तेव्हां, सर्व मुत्सद्यांसारखें **बापूंसही** जवळ बोलावून **माधवरावांनीं**, आतां यापुढें या राज्याचें कल्याण चिंता, दिवसेंदिवस त्याची भरभराट होई अशा तऱ्हेनें वागा, मी तर सांप्रत मरणोन्मुख आहें. पुष्कळ गोष्टी माझ्या हातून व्हावयाच्या त्या तशाच राहिल्या. आजवर माझ्या गोष्टी गुदस्त झाल्या त्याचें कांहीं मनांत आणूं नका, इत्यादि प्रकारें सांगितलें. व **बापूंनींही** तें मान्य केलें. परंतु **राघोबाचा बापूला** कैवार भारी तो कांहीं कमी झाला नाहीं. **नारायणरावाला** मारण्याचा नसेल पण धरण्याच्या कटांत **बापूचें** अंग होतें. तथापि बारभाईपैकींही एक **बापू** असून **राघोबाला** पदच्युत करण्याच्या कामीं **बापू** असे. पुढें बारभाईतही फितूर याच शाहाण्यानें मांडला. असें प्रथमपासून याचें दुटप्पी वर्तन महशूर असे. याची अखेर किल्यांतील कैदेंतच झाली ! पेशवाईतला सबंध शाहणा ह्मणून नांवाजलेल्या गृहस्थाचें दुटप्पी वर्तन मात्र इतिहासांतून आढळतें. दुसरा कांहीं शहाणपणा ह्मणण्यासारखा कोठें दिसून येत नाहीं. **नानाफडणीस** अर्धा शाहाणा पण त्याचें तेज बरेंच सुरेख फांकलें होतें.

सर्वांस माहीत आहेच. अशा प्रकारें नारायणरावांसंबंधाची तजवीज झाल्यानंतर कारभारी लोकांकडे वळून श्रीमंत बोलले "मी तर मरण्याला आतां सिद्धच आहें. पण माझें मन तीन गोष्टींमुळें गुंततें. त्या तीन गोष्टी पूर्ण करितों असें कोणीं खात्रीनें सांगाल तर माझा जीव घुटमळणार नाहीं, माझी आशा उरली नाहीं असें होईल. मग मी आनंदानें मरेन." तेव्हां सर्व मंडळी एकमेकांकडे टकमक बघूं लागली आणि मग सर्वांनीं एकदिलानें सांगितलें कीं, त्या तीन गोष्टी कोणत्या तें कृपा करून सांगावें. यथाशक्ति सेवा करण्यासाठींच जन्म घेतला आहे. तेव्हां माधवरावांनीं उत्तर केलें (१) वडिलांच्या पश्चात् पानपतच्या लढाईचा सूड घ्यावा तसा माझ्या हातून घेणें झालें नाहीं तो घ्यावा. (२) हैदराचें पारिपत्य तसेंच अर्धें राहिलें आहे आणि (३) तिसरी गोष्ट कर्ज फार झालें तें आतांच्या आतां फिटेल तर मी आनंदानें मरेन." तेव्हां नानाफडणिसानें छातीस हात लावून मी कर्ज फेडीन असें नुस्तें ह्मटलें एवढेंच नव्हे, तर तेथल्या तेथें सावकारांचा हवाला देऊन कर्जरोखे माधवरावांसमक्ष आणून दिले. ह्मणजे आपल्या दौलतीस असलेल्या कर्जाची इतकी माधवरावांस काळजी होती.

यानंतर तीन चार दिवसांनीं श्रीमंत प्रौढप्रतापनिधि माधवरावांचें प्राणोत्क्रमण झालें! मराठ्यांच्या भाग्यदिनकराचा मध्यान्हकाळ माधवराव पेशव्यांची कारकीर्द, पण ती अशा अल्पावकाशांत संपली, हें दुर्भाग्य आपल्या लोकांचें! स्वराज्यसुखाचे पुढें जे सोहाळे झाले व त्याची अखेर कोण्या प्रकारें झाली हें सर्वांस माहीतच आहे. आणि इतका वेळ हकीकत निवेदन केली यावरून, सारी कारकीर्द एक तपभर सुद्धां नसतां, ती प्रजेस कशी आनंदकारक व दुस्मनास त्रासदायक झाली हें

कोणासही कळून येणार आहे. पण ईश्वरी योजनेपुढें मनुष्याचें काय चालणार! ह्मणूनच **माधवराव** आणखी चार वर्षें असते तर असें झालें असतें, तमकें होतें अशीं विधानें करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

**माधवराव** स्वर्गवासी होतांच त्यांची पतिव्रता स्त्री **रमाबाई** ह्यांनीं सहगमन केलें. अशा प्रकारें पेशवे **माधवराव** आणि त्यांची स्त्री **रमाबाई** ह्यांनीं पेशवेपणाची मसनद **नारायणरावां**साठीं ह्मणून मोकळी केली. पण पुढें त्या मसनदीवर बसणाऱ्यांच्या कपाळीं काय होतें याचा उल्लेख येथें करण्यांत अर्थ नाहीं. एकंदरींत **माधवरावांचा** मृत्यु मराठ्यांच्या साम्राज्यास जबरदस्त धक्का, त्यांच्या वाढत्या प्रतापसागराची ओहटी व पुढें ओढवणाऱ्या विनाशकाळाची पताका, हेंच खरें!

**त्यांचा स्वभाव, गुणदोष इत्यादि:**—इतका वेळ प्रताप गाइले, पण आतां तो प्रतापमुगुटमणीच जर काळानें हिरावून नेला तर पुढें त्याचें गावें तरी काय? स्वभावादिकांचें वर्णन करावयाचें राहिलें तेवढें करून, सोडलेल्या एका अध्यायाची परिसमाप्ति करावी, ह्मणजे आजचें काम झालें.

**माधवरावांचा** स्वभाव फार तापट असे. त्यांना अपराध असा कधींच सहन होत नव्हता. होळकरांचा दिवाण **गंगोबा, राघोबाच्या** पक्षाचा. त्याला **माधवरावांचें** करणें आवडत नसे. एके दिवशीं भरदरबारांत "येथें चाललेले सर्व चाळे या वृद्ध दृष्टीला दिसतात" वगैरे कायसेंसें वेजा भाषण **गंगोबांच्या** तोंडांतून निघालें. त्यासरशीं मसनदीवरून उठून **माधवरावांनीं, गंगोबांच्या** श्रीमुखांत दोन लगावल्या! इतकी प्रकृति तापट. प्रकृति तापट खरी, पण प्रसंगीं अतिनम्रही तितकीच. **राघोबांची** व यांची पहिली लढाई झाली त्या वेळचें

माधवरावांचें वर्तन किंवा हैदराच्या तहाच्या वेळीं काकाच्या स्वाधीन केलेला मान, इत्यादिकांवरून पाहिलें ह्मणजे, माधवरावांच्या अंगीं समयोचित नम्रताही बरीच होती असें स्पष्ट दिसतें. राघोबाचें व माधवरावांचें वैर शमलें तेव्हां माधवरावांनीं त्याच्या पक्षाच्या मंडळीचा छळ केल्याचें कोठें उदाहरण नाहीं. एक विठ्ठल शिवदेवाचें तेवढें आहे. पण तो प्रसंग निराळा व त्याचें कारणही तसेंच अगदीं वेगळें. तथापि विठ्ठल शिवदेवांनीं आपल्या समशेरीचें अप्रतिम तेज माधवरावांस हैदरच्या युद्धप्रसंगीं दाखविलें तेव्हां, माधवराव, जातीनें शाबासकी देण्याकरितां विठ्ठलरावांच्या डेऱ्यांवर गेले होते! ह्मणजे माधवराव तापट खरे, पण द्वेष्टे, दीर्घद्वेषी नव्हते. गुणग्राही होते, रागीट खरे पण प्रसंगविशेषीं राग आंवरण्याची शक्ति त्यांच्या अंगीं होती. माधवराव तापट तसेंच सक्त असत. ह्मणजे एखादा त्यांनीं हुकूम केला आणि तो कोणी अमान्य केला किंवा तिकडे कोणाचें दुर्लक्ष्य झालें तर त्यांना तें खपत नसे. सरकारकामदारांनीं प्रजेस वेठीला धरूं नये अशी माधवरावांची ताकीद असे. तिचें उल्लंघन त्यांच्या मर्जींतल्या एका कमावीसदारानें केलें. माधवरावांनीं त्याला तात्काळ कामावरून दूर केलें, आणि त्याच्या हातून बेगारीस दिलेला बोजा उचलविला.

महादजी शिंदे, माधवरावांच्या कृपेंतील सरदार. त्यांच्या लष्करी गुणाला माधवराव अगदीं लुब्ध. पण एके दिवशीं तुह्मी हिंदुस्थानांत जा. असा निरोप माधवरावांनीं दिला तरी तेथून त्यांचा तळ हालला नव्हता. थेउरास गणपतिदर्शनार्थ माधवराव जात असतां शिंद्यांचे तंबू माधवरावांच्या दृष्टीस पडले. तेव्हां शिंद्यांस तेथल्या तेथें

चोलावून आणून मी परत येण्याचे आधीं येथून तंबू उपटले नाहींत तर तुह्मांला शासन करीन अशी जरब **माधवरावांनीं** दिली आणि त्याप्रमाणें पाटीलबुवांनींही आपलें सैन्य लगेच तेथून हालविलें. ह्मणजे **माधवरावांची** अशी जरब होती! **माधवरावांनीं**, चार ढालाईत, हिंदुस्थानांत शिंदेहोळकरांकडे पाठविले होते. त्या वेळीं बादशाही मसलतींत ते मराठे सरदार गुंतलेले. पण ढालाईत पाहातांच हातचें काम तसेंच टाकून ढालाईतांजवळ, आलेल्या पत्रांचीं उत्तरें, त्यांनीं आधीं दिलीं. हें पाहून बादशाही उमरावांस आश्चर्य वाटलें कीं, ढालाईत ते काय आणि त्यांनीं अशा सरदारांस परतविलें ह्मणजे काय. तस्मात् त्यांच्या धन्याच्या जरबेची व सरदारांच्या आज्ञाधारकतेची कमाल आहे!

एका ब्राह्मणाची जागा हैदराबादेस होती, ती तेथील दिवाणानें उपटली. ती परत देण्याविषयीं त्यांच्या वकिलाकडून **निजामास** ताकीद झाली असतां ती जागा मिळाली नाहीं; तेव्हां **माधवरावांनीं** लगेच सैन्य सुद्धां निजामावर रवाना केलें! इतका तेजस्वीपणा होता.

**माधवरावांच्या** स्वभावाला अन्याय असा बिलकूल खपत नसे. आपल्या प्रजेला उत्तम न्याय मिळावा ही त्याची अति उत्कट इच्छा, इतकेंच नव्हे तर, तिकडे त्याचें फार लक्ष्य असे.

अन्यायानें मोठें राज्य मिळत असलें तरी त्याचा **माधवरावांला** फार तिटकारा होता. **मल्हाररावांमागें** होळकराची व **जनकोजीमागें** शिंद्याची दौलत घशाखालीं उतरवावी, निदान पुष्कळशी खंडणी तरी घ्यावी, ही सल्ला व तशी खटपट **राघोबाची**, पण **माधवरावांला** तसें करणें मुळींच आवडलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर चुलत्याच्या या लोभाची त्यानें पूर्ण निर्भर्त्सना करून योग्य वारसदारांचाच कैवार घेतला. आपल्या

सरदारांशीं मोठ्या न्यायाची वर्तणूक ठेवण्यांत **माधवरावांला** अतिशय आनंद वाटे. पूर्वापार कदीमची वहिवाट आणि तींत हात घालीत आपल्या पोळीवर तूप ओढण्याची बुद्धि—वाईट वासना सुद्धां **माधवरावांस** कधीं शिवली नाहीं.

"आपल्या प्रजेची भरभराट तीच आपली" असा **माधवरावांनीं** "जाहिरनामा" प्रगट केला नाहीं खरा, पण त्यांचें वर्तन प्रजेची भरभराट होई असेंच असे. प्रजेला अति सत्वर आणि खरा न्याय मिळावा अशी **माधवरावांची** अगदीं खरी व मनापासून इच्छा आणि तदर्थ त्यांचें नेहमीं झटणेंही असे. थेट हुजूर-पर्यंत दाद लावण्याची मुभा **माधवरावांच्या** कारकीर्दींत होती तशी दुसऱ्याच्या आढळत नाहीं.

**रामशास्त्री** परभुणे नामक अति विद्वान् नैय्यायिक शास्त्री होता. त्याची नेमणूक **माधवरावांनीं** मुख्य न्याया-धिशाच्या कामीं केली होती. हा न्यायाधीश इतका निस्पृह, एवढा विद्वान् आणि इतका न्यायी होता कीं त्याची बरो-बरी कोणत्याही गुणानें करणारा आमच्या मंडळांत त्याच्या-सारखा अद्याप दुसरा झाला नाहीं. आरंभीं हा एक शागीर्द होता. धन्याच्या पायांवर पाणी घालीत असतां तेथें विक्रीस आलेल्या एका मोत्यांच्या चौकड्यावर **राम्याचें** लक्ष्य गेलें आणि त्यामुळें धन्याच्या पायांवर पाणी पडेना, धार दुसरीकडे जाऊं लागली. तेव्हां धन्यानें, अरे राम्या, तुझें लक्ष्य कोणी-कडे गेलें? असा दरडावून प्रश्न केला, तेव्हां **राम्यानें** खरें कारण सांगितलें. मूर्खा, तुझ्यासारख्या शागिर्दाला असले चौकडे पाहून काय कर्तव्य? शूर पुरुष, विद्वान्, शास्त्री, अशांसार-ख्यांचे हे जिन्नस. असें यजमानांनीं ह्मणतांच **राम्यानें** वि-चार केला कीं, शूर कांहीं आपणांस होतां यावयाचें नाहीं, पण

विद्वान्–शास्त्री होऊं. आणि लगेच ही स्वारी जी निघाली ती काशीस जाऊन थडकली. तेथें गेल्यावर सर्व शास्त्रांचें अध्ययन केल्यानंतर परत आपल्या मुलुखीं आले. तों त्या वेळीं **माधवरावां**ची कारकीर्द. त्यांनीं या पुरुषाच्या अंगचे लोकोत्तर गुण पाहून त्यांच्याकडे मुख्य न्यायाधिकाऱ्याचा अधिकार सोंपविला. त्या अधिकारास **रामशास्त्री** पूर्णपणें योग्य होते, ते इतके कीं, त्यांच्या हातून अन्याय झाला अशी एकही गोष्ट घडली नाहीं. इंग्रज लोकांत म्याथ्युहेल नामक अति विख्यात न्यायाधीश होऊन गेला त्याची योग्यता इंग्रज इतिहासकार या **रामशास्त्र्या**स देतात. **रामशास्त्र्या**सारखा निस्पृही आमच्या लोकांत अद्याप कोणी झाला नाहीं आणि पुढें होईल अशी आशाही पण दिसत नाहीं.[1] एके दिवशीं **माधवरावां**च्या भे-

१ सांप्रतच्या आमच्या मराठे मंडळाची स्थिति अत्यंत भयावह व अति कारुण्यास्पद आहे; ती इतकी कीं, पुढें आमच्या मंडळाचें होणार तरी काय हें कांहीं कळत नाहीं. गृहशिक्षण तुटत चाललें नव्हे, मुळींच त्याचें सुरेख आणि कडकडीत पथ्य. समाजबंधारण ह्मणून काय तें उरलें नाहीं. 'आपलें काय जातें, होयला होय ह्मणावें, रिकामी पंचाईत कुणीं करावी,' असा उपदेश सर्वांचा—घरच्यादारच्यांचा—गतस्वातंत्र्याची झुळूक देखील आप्तइष्ट ह्मणविणारांस खपत नाहीं. 'आपल्याला काय कर्तव्य? रिकामी उरस्फोड कोणी करावी? बाबा, काय ह्मणतोस, तुझेंच खरें असें कां होईना' असें वागणें प्रापंचिकाचें उत्तम लक्षण असा उपदेश हरघडी ऐकूं येत आहे, ही गोष्ट सर्वांस माहीत आहेच. इंग्लंडच्या इतिहासांत सत्यदेवतेकरितां अगर मतस्वातंत्र्याखातर कैकांनीं प्राण दिलेले आहेत. पण तसा योग आमच्या इतिहासांत हा वेळपर्यंत आलेला नाहीं. पुढें येईल असेंही वाटत नाहीं याचें कारण आपल्या समाजपद्धतीचें सूक्ष्मावलोकन करण्याची संवय असणारांस कळून

टीस **रामशास्त्री** गेले. त्यावेळीं, **श्रीमंत** स्नानसंध्येस बसले आहेत ह्मणून शागिर्दानें **रामशास्त्रांस** सांगितलें. त्यावरून शास्त्रीबुवा तसेच निघून गेले. पुढें गांठ पडली तेव्हां **रामशास्त्री** ह्मणाले, स्नानसंध्यादि जपतपांत काळ घालणाऱ्या ब्राह्मणांच्या पोटीं तुह्मी जन्मलां नाहींत. राज्यकारभाराचें ओझें शिरावर घेतलें आहे. तें उत्तम करा ह्मणजे त्यांतच स्नानसंध्येचें फळ आहे. अथवा ब्राह्मणधर्मानुसार वर्तन कर्तव्य असल्यास मजबरोबर श्रीकाशीक्षेत्रास चलावें, मी यथासांग करवीन! असा रोकडा जबाब **रामशास्त्र्यांनीं** दिला. **राघोबालाही** याच खऱ्या न्यायमूर्तीनें तोंडावर आणि भरदरबारांत सांगितलें कीं मीं **नारायणरावांच्या** वधाची पुरी चौकशी केली, त्यांत तुह्मींच हा वध करविला ,असें निष्पन्न होतें. त्यावर **राघोबानें** त्या ब्राह्मणास विचारिलें, याला प्रायश्चित्त काय ? **रामशास्त्र्यांनीं** जबाब दिला, देहांतप्रायश्चित्ताखेरीज अन्य शासन नाहीं. आणि तुमच्यासारख्या पापी पुरुषाचा, पुण्यप्रतापी पेशव्यांच्या गादीला विटाळ झाला तेव्हां मला येथें राहणें नाहीं, असें ह्मणून

---

येईलच. मुखस्तुति, तोंडापुरतें पुढें पुढें करणें आणि मताभिमानाचा विटाळ, हेच हल्लीं गृहस्थाश्रमीचे मुख्य गुण मानले जात आहेत. तेव्हां अशा काळांत **रामशास्त्र्यांची** छाया प्रतिबिंबित झालेली असा प्राणी कसा सांपडेल ? एका गंगाभागिरथीला अमेरिकेंत तीन कोटि शिवाजि आढळले किंवा त्यांच्या सदनांत पाऊल टाकणाऱ्या सर्व "शारदा" बनतात तद्वत् कांहीं **रामशास्त्री**ही, संमतिकायद्याच्या वेळीं अवतीर्ण झाल्याची फुशारकी, कोणी प्रार्थनासमाजादिकांच्या चळवळीनें लूथरत्व संपादणाऱ्यासारखी, मारीत असतील तर ती गोष्ट निराळी आहे. आमची नीति, न्यायबुद्धि सध्यां फार कमती आहे व तिच्या पूर्ण ओहटीचाच हा काळ दिसतो हें मात्र कांहीं खोटें नाहीं. ह्मणून **रामशास्त्री** निपजणें अशक्य वाटतें.

तो ब्राह्मण तडख चालता झाला, त्यानें पुनः पेशवाईचें दर्शन घेतलें नाहीं! पेशव्यांची प्रख्यात दक्षणा दर वर्षी पुण्यास होई. त्या वेळीं परीक्षकही **रामशास्त्रीच** असत. **रामशास्त्र्यांचे** एक चिरंजीव **शंखोबा** होते. ते सर न्यायाधिशांचे चिरंजीव ह्मणून त्यांचें कोणी संभावनेच्या यादींत नांव घातलें होतें, पण तें देखील या ब्राह्मणास खपलें नाहीं. स्वतः त्यांनीं तें नांव खोडून टाकिलें, इतकी यांची निस्पृहता! तेव्हां अशा अनुपमेय न्यायाधिशाच्या हातीं न्याय देण्याचें काम असल्यावर अन्याय–कोठें व्हावयाला! आणि अशा न्यायी पुरुषाचा खरा चाहता काय कमी न्यायी समजावयाचा?

**माधवरावांच्या** अंगीं गुणग्राहकताही फार चांगली होती. कोणाच्या अंगीं काय गुण आहे हें **माधवराव** चटकन् ओळखीत आणि त्या गुणाचा तसाच ते उपयोगही करून घेत असत. **महादजी** विदुरवंश. अस्सल वंश पानपतांतल्या रणकुंडांत दग्ध झालेला, पण **महादजीच्या** अंगीं अस्सल वंशाचें नांव राखण्याइतके गुण आहेत, असें पाहतांच त्याला शिंद्याच्या दौलतीचा **माधवरावांनीं** अधिकारी केला! ही त्याची गुणग्राहकता कांहीं लहानसान नव्हे. पानिपतांत प्रथमाहुतीस पडलेला **बळवंत** मेहेंदळ्याचा मुलगा **अप्पा** बळवंत, ज्याला टिप्पूनें "अम्माबळवंत" (विधवाबाईस कर्नाटकी भाषेत अम्मा ह्मणतात), असें आपल्या कारकिर्दीच्या[१] इतिहासांत लिहविलें

---

१ प्रस्तुतच्या लेखकानें विविधज्ञानविस्तार पुस्तक २२ अंक ६ यांत टिप्पूचा भागूबाईपणा या सदराखालीं खालील आख्याइका लिहिलेली आहे ती येणेंप्रमाणें:—"श्रीरंगपट्टणकर टिप्पूनें जेनुल्ला अबदीन यांजकडून आपल्या कारकीर्दीचा इतिहास पारशी भाषेंत लिहविला. त्यांत व्यक्तिमात्राचा नामनिर्देश करितांना खाजगी

आहे, तो वाढविला. **बळवंतराव** मेहेंदळ्याची स्त्री सती जाऊं लागली तेव्हां, तुझ्या मुलास सवाई **बळवंतराव** करीन, अशी भाक **सदाशिवराव**भाऊनें दिली, त्याची चाड **माधवरावांनीं** इतकी धरली. त्यांत त्यांच्या अंगचा कोणता गुण व्यक्त होता हें कांहीं कोणास सांगावयाला नको. **विठ्ठल शिवदेव, माधवरावांला** गादीवरून दूर करण्याच्या कटांत अति प्रमुख, पण त्यांच्या अंगच्या शूरत्वास **माधवराव** लुब्ध. तेव्हां याच्यापेक्षां गुणग्राहकतेचें दुसरें उदाहरण कोणतें हवें ?

सारांश **माधवराव** तापट, जरबी, तेजस्वी व गुणग्राहक आणि अत्यंत न्यायप्रिय असत. वय लहान पण त्यांच्या अंगीं अधिकारानुरूप भारदस्तपणा पूर्ण होता. प्रसंग जाणून वागण्यांत तर त्यांच्यासारखा दुसरा पुरुष विरळाच. मराठी साम्राज्याच्या भरभराटीसाठीं खाजगी वैराकडे किंवा तसल्या अन्य गोष्टींकडे अगदीं दुर्लक्ष्य करणें, हा अति विलक्षण गुण **माधवरावांत** होता. हें, भोंसले नागपूरकरांशीं केलेल्या सलोख्यावरून व त्यांच्याशीं आणभाकपुरःसर पुढें शुद्धांतःकरणानें लिहिलेल्या त्यांच्या स्वदस्तुरच्या पत्रांवरून आणि **राघोबाच्या** बगलेंतील मंडळीशीं केलेल्या वर्तनावरून दिसतें. राज्यकारभार स्वतंत्र आणि आपलें खाजगी वर्तन स्वतंत्र जाणण्याची व त्या-

---

वैराचा—मात्र मर्दानी नव्हे, अगदीं जनानी—स्पष्ट उल्लेख केला आहे. कुर्गप्रांताच्या उत्तेनाईकांचें नांव **कुत्तेनाईक**, मराठ्यांकडील अप्पा बळवंताचें **अम्मा बळवंत** (विधवाबाई), मराठ्यांस **मरते** अशीं नांवें टिप्पूनें मुद्दाम चोहोंकडे लिहविलीं आहेत. या पुस्तकाच्या पृष्ठांवर हें पुस्तक अन्य कोणीं पाहूं नये अशा अर्थाचें पारशी वाक्य आहे. त्यावरून त्याची त्यासच शरम वाटली असावी असें दिसतें. वाघाचें करणें नव्हे.” “प्रकाशक.”

प्रमाणें वागण्याची अप्रतिम व अत्यावश्यक कर्तबगारी **माधव-रावांत** असे.

**माधवराव,** रणामध्यें अप्रतिम शूर असे नांवाजलेले. स्वतः घोड्यावर स्वार होऊन सर्वांच्या पुढें ते समरकार्य यथासांग चालवीत असत. बदामीच्या हल्ल्यांत शत्रूंच्या गोळ्यांचा वर्षाव एकसारखा चालला आहे अशा वेळीं, खासा— **श्रीमंत,** सर्वांच्या अग्रभागीं हौसेनें लढताहेत असें पाहून कैकांनीं, स्वामी आपण जरा मागें यावें, अशी विज्ञप्ति केली. तर, त्यांस मरावयाचा असेन तर घरीं बसलों तरी मृत्यु चुकेल कीं काय ? असें, या पेशवे **माधवरावांनीं** उत्तर दिलें. **हैदराशीं** पहिला प्रसंग पडला त्या वेळीं मराठ्यांपेक्ष्या तिप्पट सैन्य **हैदरखानाचें**, कवायती पलटणें जय्यत शत्रूंकडे, स्वतः हैदरखां निरढावलेला पट्टा शूर आणि रणधुरंधर; त्याचे कावे मोठे मी मी ह्मणणारांस तोंडघशीं पाडीत, पण श्रीमंत प्रौढप्रतापनिधी पेशवे **माधवराव,** यानीं ह्मणूनच त्याची डाळ शिजूं दिली नाहीं. जातीनें सर्व सेना हुकमाप्रमाणें वागवीत, शेरास सव्वाशेर अशी तरुण **माधवरावांनीं** बुढ्या **हैदरखानाची** खात्री करून दिली. यापेक्षां **माधवरावांच्या** रणधुरंधरतेचें आणखी कोणतें मोठें उदाहरण पाहिजे ? **निजामानें** खुद्द **राघोबास** कैद करून आपल्या सैन्यांत नेलें, तेव्हां, चुलत्याच्या कैदेंत असतांनाही विजयमदानें गुंग झालेल्या निजामाची चांगली खोड मोडून चुलत्याची सुटका करणारे **माधवराव** काय लहानसान शूर ? तेव्हां सारांश इतकाच कीं इतर गुणांप्रमाणें **माधवराव** शूरही तसेच होते. वाडवडिलांनीं कीर्तिनगारा वाजविला त्याच्यापेक्षां आपण जास्त कमाई करावी ही त्यांची प्रबळ इच्छा होती व त्याप्रमाणें ते थोडक्याच वेळेंत वागलेही.

पत्रव्यवहार, मुलखाचा बंदोबस्त, जमाखर्चाची व्यवस्था इत्यादि मुत्सुदगिरींत **माधवराव** पुनः पूर्ण पटाईत असत. त्यांच्या हातचीं अशीं पत्रें काव्येतिहासकारांनीं छापलीं आहेत, त्यांवरून त्यांचा कारकुनी बाणा चांगला व्यक्त होतो. **माधवरावांच्या** वेळेला पेशवाईचें उत्पन्न सात कोटींचें असे. मुलूख चोहोंकडे पसरलेला. त्यांचा कारभार व वसुली हिशेब ते डोळ्यांत तेल घालून पाहत. माझें उत्पन्न एवढें, खर्च इतका, हें सारें त्यांच्या नजरेपुढें असे. आणि ह्मणूनच मरणसमयीं आपल्या कर्जाची त्यांला इतकी काळजी वाटली. मरणसमयीं आणि पेशवाई पुरुषाला एवढी काळजी ही लहानसान गोष्ट नव्हे. इंग्रज इतिहासकार हिंदुराजे खर्चाची वेळ आली ह्मणजे लुटीनें पैसे मिळवीत असें प्रतिपादतात. तसा प्रकार **माधवरावांचा** तर नव्हता. असें त्यांना कबूल करणें भाग पडेल. सावकारीचें देणें आणि तें दिलें पाहिजे ही इच्छा पेशवे **माधवरावांला**, इतकेंच सांगितलें तरी, त्यांच्या चोख वर्तनाची आपोआप ओळख पटण्यासारखी आहे. तेव्हां आतां असा त्यांच्या गुणांचा कितीही महिमा गाइला तरी तो शेवटीं राहाणार अपुराच, ह्मणून आपणही त्या नादास जास्त लागण्यांत अर्थ नाहीं. श्रीमंत पंतप्रधान पेशवा, पटाईत मुत्सुद्दी, परम न्यायी व नीतिमान, थोर पुरुष, अगदीं करारी, रणधुरंधर योद्धा, खरा प्रतापनिधि पेशवा, कडवा ब्राह्मण आणि भाग्यशाली असा होऊन गेला एवढें खरें. अवघी १० वर्षांची कारकीर्द, पण ती त्यांनीं फार सुरेख गाजविली. त्यांच्या मनांत पुष्कळ चांगल्या गोष्टी कर्तव्य होत्या, पण ईश्वराला तसें आवडलें नाहीं. असले पुरुष अल्पायुषी होणें त्या गादीचें आणि घराण्याचें दुर्दैव. **राघोबाला** दीर्घायुष्य आणि **माधवरावांला** अल्पायुष्य यांतच ईश्वरी क्षोभ दिसून

येतो. असो; **प्रौढप्रतापनिधि** पेशव्यांचें चरित्र आतां येथें संपविणें भाग आहे. कारण पुढें काय लिहावें हें कांहीं समजत नाहीं. **माधवरावांच्या** चरित्रावरून विक्रमोर्वशींतील—

शमयति गजानन्यान्गंधद्विपः कलभोपि सन् ।
भवति सुतरां वेगोदग्रं भुजंगशिशोर्विषम् ॥
भुवमधिपतिर्बालावस्थोप्यलं परिरक्षितुं ।
न खलु वयसा जात्यैवायं स्वकार्यसहो भरः ॥

ह्या कालिदासोक्तीचें स्मरण होतें.

**धनुर्धारी.**